# माणूस

३ फेब्रुवारी १९७३ । पन्नास पैसे

सप्रेम नमस्कार

गेली दहा-पंधरा वर्षे साहित्यक्षेत्रात जमेल ते बरे-वाईट लिहिण्याचा मी प्रयत्न करतो आहे. त्यातही काही विधाने, काही कल्पना एस्टॅब्लिशमेंटविरोधीही असतात. इकडील काही राजकारणी मंडळी त्यावर चर्चा किंवा प्रत्यक्ष वाद न घालता – स्वतःच्या एजंटांकरवी मला किंवा माझ्या सौ. ला अचकट विचकट टॉंटस् मारावयास लावतात; हा आमचा नित्याचा अनुभव झाला आहे. काही दिवस एका शाळेत नोकरी केली. त्या शाळेतून एका अशाच एजंटाकडून धमक्या देऊन मॅनेजमेंटने मला घालवून दिले. त्या शाळेकडून मला अजून तीन महिन्यांचा पगार घेणे आहे. दुसऱ्या शाळेकडून मला गेल्या सहा वर्षांपासून सात महिन्यांचा पगार मिळालेला नाही. हे सर्व पाहिले म्हणजे मी समाजवादी राज्यात राहतो आहे की एखाद्या जुलमी फॅसिस्ट राज्यात राहतो आहे अशी शंका येऊ लागली आहे. पहिल्या शाळेची मॅनेजमेंट सर्वोदयाच्या अमलाखाली तर दुसऱ्या शाळेची मॅनेजमेंट कॉंग्रेसची आहे. ह्या निवेदनानंतर जर मला पगार मिळू शकला नाही तर मी उपोषणाची नोटीस द्यायच्या विचारात आहे. जय कॉंग्रेस ! जय समाजवाद ! !

—वामन इंगळे, काटोल (नागपूर)

संपादक
श्री. ग. माजगावकर

३ फेब्रुवारी १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : पस्तीस

---

## सप्रेम नमस्कार...

**१ जानेवारी, ७३**

□ आपल्या माणूस साप्ताहिकाचा मी जुना चहाता. त्यातील प्रेरक-पोषक लेखन मला खूप आवडते. गेली सुमारे पंचवीस वर्षे आम्ही कोकण प्रांतात होतो. व्यवसाय निवृत्त झालो आणि पुण्यात आलो. योगायोगाने उद्योगपती श्री. बाबुरावजी पारखे यांच्याशी गाठ-भेट झाली. वैचारीक धागेदोरे जुळले. त्यांचं सौजन्य-सहाय्य मिळाले आणि मी डांग प्रदेशात आलो.

माणूसचा वैचारिक प्रवाह भूमिपुत्रांना सहाय्यक ठरणारा. येथे माझी बैठक तीच आहे. एकेकाळी दंडकारण्य म्हणून आपल्या रामायणात गाजलेला हा भाग राजकारण्यांच्या झटापटीमुळे महाराष्ट्राच्या नकाशातून गुजरात राज्याकडे सरकला-झुकला.

४० × ४० मैलांच्या विस्तृत भू-प्रदेशात जंगल संपत्तीने ठासून भरलेला हा डांग प्रदेश खरोखरच लोभसवाणा आहे. येथील आदिवासी-गावित-भिल्ल कुणबी. त्यांची मूळ बोलीभाषा डांगी. उदाहरणार्थ 'कठ जाव तुला—म्हणजे—कुणीकडे निघालात ?' मराठी आणि गुजराथी भाषेचा मिश्र प्रभाव डांगी बोलीवर आहे. दिवसाचे आठ वाजले तरी सूर्याला कुशीत लपवणारे गर्द

---

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

वनराईचे पहाड येथे सर्वत्र आहेत. त्यापैकी 'कालीबेल' नावाच्या जंगलात बसून मी हे पत्र आपल्याला लिहीत आहे.

आता साठीच्या आसपास रेंगाळणारे माझे जीवन माझे गर्वहरण करण्यासाठी टपले असावे. कारण चंद्र डोक्यावर आहे. आम्ही खाली शेकोटी पेटवली आहे. रानातील रम्यभीषण शांतता चाळवणाऱ्या गप्पा रंगल्या आहेत. निष्पाप मनाचे अनेक म्हातारे आदिवासी मला चौपाईवर ठेवून मोकळ्या मनाचा प्रसाद वाटीत आहेत. एकूण मजा आहे राव.

माझ्या छोट्याशा आयुष्यात मला खूप मोठे अनुभव मिळाले. परंतु आज हे प्रेमळ आदिवासी मला वेगळाच गुरुमंत्र देत आहेत. त्यांच्या बोलण्यातलं तात्पर्य असं आहे की--

'शहरी लोक जंगली लोकांना सुधारण्याचे नावाखाली कधीमधी इकडे येतात आणि रामायणातील कांचनमृगाप्रमाणे आम्हाला नको तसली भुरळ पाडतात. भूमिपुत्रांचा उद्धार करण्याच्या गप्पा मारतात, परंतु या भूमीपासून त्यांच्या पुत्रांची फाळणी होईल असं (बद)कर्म करतात. शहरी माणूस ज्या शेती आणि जंगल संपत्तीवर रात्रंदिवस उड्या मारतो-त्या संपत्तीचे झरे बुजवण्याचे पाप या सुधारणेच्या नावाखाली चालू आहे. आम्हा भूमिपुत्रांचा उद्धार करण्यासाठी जे जे कुणी महाभाग आजपर्यंत इकडे आले त्यांनी केले काय? तर आमची भूमिसेवा करण्याची उपजत सवय गाडली. आमची पोरे-पुढची पिढी-आळशी-दुबळी-बोलघेवडी केली. 'आपणासारिखे करिती तात्काळ' या संतवचनाचा दुरुपयोग केला. तेव्हा यापुढे तरी कृपा करा आणि उद्धाराच्या नावाखाली आमची अशी शिकार करू नका.'

संपादक महाराज, माणसातला माणूस न झिंगता जागा असला तर तो किती प्रामाणिक असतो त्याचा खास अनुभव मला येथे मिळत आहे. गेले पंधरा दिवस या दऱ्याखोऱ्यातील जंगली समजल्या जाणाऱ्या खऱ्याखुऱ्या देवमाणसात मी वावरत आहे. येथील जंगलसृष्टी मला नवीन मंगलदृष्टी मुक्त मनाने देत आहे.

भारताचा एक पुत्र म्हणून मला काही खास अधिकार आहेत. त्याचा सदुपयोग करणे हा माझा आवडता उद्योग आहे. त्या दृष्टीने मी या आदिवासी मंडळींजवळ जेव्हा मनमोकळे बोलतो त्यावेळी आपण ज्याला सध्या सुशिक्षण समजतो ते तसे खरेच आहे का, हा प्रश्न मला बेचैन करतो. आपला देश शेती व जंगल संपत्तीने सुजल-सुफल-मलयजशीतल असावा ही मूळ भूमिकाच जिथे डळमळली तिथे बोलणार काय अन् लिहिणार काय?

श्रीमान् बाबुरावजी पारखे नेहमी सांगत असतात की, 'वाघाने आपला वाघपणा सोडला तर त्याची जी अवस्था होईल तीच दुर्दशा या देशातील भूमिपुत्र-कन्यकांनी आपली मूळची बैठक सोडली तर होईल. त्यासाठी

सरकारला जागृत ठेवण्याचे आणि भूमिसेवेची बैठक शाबूद ठेवण्याचे दुहेरी काम आपणच करायला हवे. निष्ठा आणि प्रतिष्ठा सार्थ व्हायला हव्यात. त्यासाठी 'भूमिसेवकांची शिस्तबद्ध उद्योगसेना उभारणे' हाच यापुढे आपला व्रत-कार्यक्रम निश्चित झाला पाहिजे.'

डॉ. वेदकुमार रायकर, डांग

१९ जानेवारी, ७३

□ आपल्या 'माणूस' साप्ताहिकाचा २० जानेवारी १९७३ चा अंक आताच वाचला. अतिशय आवडला. तसा मी अनेक वर्षापासून 'माणूस'चा वाचक आहे. या अंकाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केल्यावाचून राहावत नाही म्हणून हे पत्र. श्री. निळू दामले यांचा 'चार दृश्ये' लेख वाचताना अक्षरशः अंगावर शहारे येत होते. इंदिरा गांधींच्या कळंब खडी केंद्राच्या भेटीचे हे 'नाटक' वाचून संताप अगदी अनावर होतो. इतके भयानक सत्य आणि वस्तुस्थिती त्यांनी सादर केली आहे.

तसेच सातारा जिल्हा परिषदेच्या राजकारणाच्या वास्तव परिस्थितीचे दर्शन घडविणारा 'बिनविरोधातून भाऊबंदकीकडे' हा लेख अतिशय यथार्थ व अभ्यासपूर्ण वाटला. मीही सातारा जिल्ह्यातील एक जागृत नागरिक आहे. 'साहेबां'च्या जिल्ह्याचे नेतृत्व करणाऱ्या काही मंडळींनी स्वार्थ आणि सत्तापिपासेपायी केलेल्या कृष्णकृत्यांचा हा जाहीर पंचनामाच म्हणावा लागेल. आता अशा प्रकारचे विचार करणारी युवकांची फळी सातारा जिल्ह्यात तयार होत आहे याची संबंधितांनी वेळीच दखल घ्यावी आणि आपल्या राजकीय डावपेचात खर्च होणारी ताकत दुष्काळाने हैराण होणाऱ्या जनतेच्या कल्याणासाठी वापरावी. अन्यथा या भाऊबंदकीतून काहीच चांगले निष्पन्न होणार नाही. या लेखातील टीकेचा विचार करण्यासाठी सद्बुद्धी त्या 'महत्त्वाकांक्षी' मंडळींना व्हावी. यात सामान्य जनतेचे कल्याण आहे.

विस्तारभयापोटी इतर वाचनीय लेखाबद्दल लिहित नाही. सत्य, परखड आणि विधायक विचार मांडण्यात 'माणूस' अग्रेसर आहे. म्हणून आम्हा तरुणांचे ते आवडते नियतकालिक आहे. हे क्रांतिकारक विचार लिहिल्याबद्दल प्रा. क्रांतिनाथ सातारकर यांना धन्यवाद. असा लेख प्रसिद्ध केल्याबद्दल आपले (संपादकांचे) अभिनंदन.

शिरीष साळुंखे, कोल्हापूर

## समता, स्वातंत्र्य आणि राष्ट्रवाद

'विकली जाणारी भारतीय माणसे' या शीर्षकाचा काही मजकूर 'माणूस'च्या २३ डिसेंबर १९७२ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यास अनु-

लक्षून मी काही शंका 'माणूस'च्या ३० डिसेंबरच्या अंकात मांडल्या होत्या. याच विषयावर ६ जानेवारी ७३ च्या अंकात सौ. दातार यांचे एक पत्रही प्रसिद्ध झाले होते.

आता श्री. प्रभाकर नारायण परांजपे यांनी 'माणूस'च्या २६ जानेवारीच्या विशेषांकात यासबंधी एक प्रदीर्घ पत्र लिहून काही विचार प्रदर्शित केले आहेत. त्यातील महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्श मी खाली घेत आहे.

परांजपे म्हणतात, 'श्री मराठे असे गृहित धरताना दिसतात की सामाजिक समता व मानसिक स्वातंत्र्य या गोष्टी विरोधी आहेत.'

मुळातील चर्चा समता व स्वातंत्र्य यांच्याबाबत असताना परांजपे या दोन्ही शब्दांस अनुक्रमे सामाजिक व मानसिक अशी विशेषणे लावून वैचारिक सैल-पणाची चूक करीत आहेत. हे बाजूस ठेवले तरी समता ही (फार तर) सामाजिक व स्वातंत्र्य हे (फार तर) मानसिक असावीत ही राष्ट्रवादी विचाराची मूलभूत मर्यादा ते अभावित-पणे व्यक्त करतात यात शंका नाही. समता व स्वातंत्र्य या गोष्टी विरोधी आहेत असे मी गृहीत धरणे शक्य नाही. कारण साधे आहे. वाटेल त्या गोष्टी गृहीत धरून सामाजिक शास्त्रात (किंबहुना सूर्याखालील प्रत्येक गोष्टीत) लुडबुड करावयास मी काही भाषा विषयाचा प्राध्यापक नाही. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र व इतिहास या चार सामाजिक शास्त्रांचा ऐतिहासिक व तात्विक अभ्यास करणारा मी एक अभ्यासक आहे. तेव्हा एवढी प्राथमिक गफलत करणे मला शक्य नाही. स्वातंत्र्याची संकल्पना सर्वांना समता लाभावी यासाठी विकसीत झाली व समतेची संकल्पना सर्वांना स्वातंत्र्य लाभावे यासाठी विकसीत झाली.

परांजपे म्हणतात त्याप्रमाणे सौ. भावे आर्थिक, सामाजिक, राजकीय बाबींवर स्वतंत्र लेख लिहिण्यास बसल्या आहेत असा आव मी आणला नाही तर सौ. भावे यांनीच आणला आहे. त्यांचा मुख्य विषय 'या माणसाच्या विकले जाण्याबद्दलचा राग व्यक्त करणे हा होता' असे परांजपे यांना वाटते. आता हा राग एक-दोन व्यक्तींबद्दल नसणार तर त्या प्रवृत्तिबाबत असणार म्हणजेच सौ. भावे यांचे विचार आर्थिक—सामाजिक बाबींवर आहेत तेव्हा त्यांना (वा परांजप्यांना) सहज सुचलेली अनुषंगिक निरीक्षणे वगैरे बचाव उप-लब्ध नाही.

लेखन म्हणजे, भाजी निवडून झाल्यावर खिडकीतून तिचा उरलेला कचरा टाकून द्यावा इतकी सहज करण्याची गोष्ट नव्हे. लेखन हे फार जबाबदारीचे काम आहे. आपला प्रति-पाद्य मुद्दा सोडून सौ. भावे यांनी जी काही इतर विधाने केली व ती ज्या ठामपणे केली त्यामुळे मी व सौ. दातार यांच्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या.

६० टक्के लोकांना अन्न, वस्त्र, निवारा पाहिजे ना, मग ते तुरुंगात

जाण्यास तयार आहेत काय असा जो नाटकी प्रश्न परांजपे विचारतात त्यावरून त्यांची मूलभूत बैठक व्यक्त होते. जणू काही ६० टक्के लोकांना अन्न, वस्त्र, निवारा देण्यासाठी इतर मार्ग उपलब्धच नाहीत. स्वातंत्र्य व समता यातील विरोध मी गृहीत धरत नसून परांजपेच गृहीत धरत आहेत. समता हवी तर स्वातंत्र्य गमावण्यास तयार आहात काय या प्रश्नाचा दुसरा कोणता अर्थ निघू शकतो ?

सौ. दातार समतेच्या समर्थनार्थ भाबडे व हळवे विचार व्यक्त करीत असतील तर परांजपेही विचारस्वातंत्र्याच्या समर्थनार्थ तितकेच भाबडे व हळवे विचार मांडीत आहेत. समाजाचा आत्मा, श्रद्धा, असंख्य लोकांचे प्राणार्पण वगैरेंतून हा भाबडेपणा व्यक्त होतो.

मूठभर लोकांमुळे समाजाचे 'समाजपण टिकून राहते (ना ?)' हे विधान तर भावडेपणाचा, भोंगळपणाचा व हळवेपणाचा अस्सल नमुनाच होय. तार्किक स्वरूपाच्या वादात असली विधाने समोर आली की मोठी पंचाईत होते. सौ. भावे व श्री. परांजपे हे दोघेही राष्ट्रवादाच्या काही चमत्कारिक व अतार्किक पण प्रभावी अशा सिद्धांताचे बळी आहेत हे उघड आहे. सिदकरांचे विचार त्यांनी मांडले म्हणून राग आला, एखाद्या कम्युनिस्टांनी ते मांडले असते तर चालले असते. हा काय प्रकार आहे ? विचार आक्षेपार्ह असले तर ते कोणी मांडले यामुळे काय फरक पडतो ? फरक असा पडतो की, कम्युनिस्ट हे आपले नाहीत (मग ते भारतीय असले तरी). ते काही बोलले तरी त्यांचे महत्त्व नाही असा हा सोशल अँप्युटेशनचा राष्ट्रवादी पवित्रा आहे. राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते असे किती वर्गांपासून दूर पळणार आहेत ?

आता परांजपे यांच्या पत्रातील सर्वात 'ऑपरेटिव्ह' भाग पाहू. ते म्हणतात, 'हे मूठभर लोक सबंध समाजाच्या वतीने विचारस्वातंत्र्याचा उपयोग करीत असतात. आपले विचारस्वातंत्र्य सबंध समाजाच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे अशी त्यांची श्रद्धा असते.'

या विधानामध्ये परांजपे खालील मुद्दे नकळत मान्य करतात.

१ : विचारस्वातंत्र्य ही समाजाच्या वतीने वापरायची वस्तू आहे.

२ : ती सबंध समाजाच्या हितासाठी वापरावयाची वस्तू आहे.

३ : विचारस्वातंत्र्य ही मूलतः सामाजिक वस्तू आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, विचारस्वातंत्र्य ही गोष्ट केवल स्वरूपाची नसून तिला काही सामाजिक संदर्भ आहे. किंबहुना स्वातंत्र्य हीच बाब सामाजिक आहे. ती एकमेकांना एकमेकांनी द्यावयाची मुभा आहे. माझे स्वातंत्र्य कोणते, किती हे मी ठरवणार असे कोणी म्हणू लागला तर ते 'स्वातंत्र्य' या सामाजिक संकल्पनेचे विडंबन ठरेल. विचारस्वातंत्र्य या नावाखाली लेखक, कलावंत व विचार-

पृष्ठ ६३ वर

# आ ले पा क

■ एस्. टी. चे जनरल मॅनेजर साळवी म्हणतात : रस्ता आहे तेथे एस्. टी. जातेच पण रस्ता नाही तेथेही एस्. टी. जाते.

मग एवढे अपघात झाले तर नवल नाही.

■ सोशॅलिस्ट पक्षाच्या पहिल्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना अध्यक्ष जॉर्ज फर्नांडिस यांनी तक्रार केली की आज विरोधी पक्ष म्हणून कोणताही पक्ष आपली भूमिका करायला तयार नाही.

त्यामुळे तर आता सत्ताधारी कॉंग्रेस पक्षच विरोधी पक्षाचीही भूमिका करायला उत्सुक आहे.

■ पुणे विद्यापीठ आणि डॉ. आपटे या प्रकरणावर लिहिलेल्या 'चौकशीचे वांगे झाले' या महाराष्ट्र-टाईम्समधील अग्रलेखात म्हटले आहे : विद्यापीठातील पदाधिकाऱ्यांनी मार्क वाढवून देणे हा गंभीर गुन्हा नव्हे हे महाराष्ट्र राज्यात आता राजमान्य झाले असल्याने विद्यार्थ्यांनी कॉपी करणे हाही गुन्हा ठरू नये.

उलट कॉपी पकडणे हा मात्र गुन्हा ठरवावा.

■ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिकोत्सवात अध्यक्ष रणजित देसाईंची ओळख करून देताना बाळ सामंत म्हणाले : त्यांचे नाव कसे छान 'रणजित' आहे; 'बाळ' नाही.

यावरून तरी बाळाने काही बोध घ्यावा की नाही ?

■ दिल्लीहून करण्यात आलेली एक अधिकृत घोषणा अशी : गेल्या काही आठवड्यात गोड्या तेलाच्या किमती बऱ्याच वाढल्यामुळे वनस्पती तुपाच्या किमती सर्व विभागात दर किलोमागे चाळीस पैशांनी वाढवण्यात येत आहेत.

गेल्या काही आठवड्यात वनस्पती तुपाच्या किमती वाढल्यामुळे गोड्या तेलाच्याही किमती आता वाढवण्यात येत आहेत, अशा दुसऱ्या अधिकृत घोषणेची वाट पाहतो आहो आम्ही.

■ एक विदुषी म्हणतात : जन्मभर स्त्रीने पुरुषाच्या ताब्यात राहावे असेच हिंदु धर्म, ख्रिश्चन धर्म, इस्लाम धर्म सांगतात.

हे तीन जगातील सर्वात उदारमतवादी धर्म आहेत असे आम्ही मानतो ते उगाच नव्हे.

■ शिक्षणाने म्हणे मनाचा मळा समृद्ध होऊन विचाराचे पीक भरघोस येते.

दुष्काळामुळे हे रूपकसुद्धा वैताग आणते.

■ साने गुरुजी बाल विकास मंदिराच्या वतीने अश्लील पोस्टर्सविरोधी निदर्शने करण्यात आली. या मोर्चात ६ ते १० वर्षे वयाच्या मुलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. मोर्चाचे नेतृत्व सर्वस्वी प्रकाश मोहाडीकर, रामभाऊ जोशी, यशवंत क्षीरसागर, आत्माराम शिंदे, बाप्पा कुणकेरकर, सुभाष समेळ अप्पा साने व सौ. सुशीला म्हात्रे यांनी केले.

या नेत्यांचे वय काय असे तुम्ही पुन्हा पुन्हा विचारलेत तरी मी काही ते तुम्हाला सांगणार नाहीये म्हटलं.

■ या मोर्चाच्या निमित्ताने झालेल्या सभेत आमदार प्रकाश मोहाडीकर यांनी सांगितले की अश्लील पोस्टर्सचा अर्थ मुलांना समजला नाही तरी लहान मुलांमध्ये जागृती करण्याचा हा एक मार्ग आहे.

कसली जागृती हो ?

■ नाटककार विद्याधरजी गोखले म्हणतात : वक्त्याला वक्तृत्वाच्या तंत्राप्रमाणेच मंत्राचेही अंग असले पाहिजे.

आणि (ध्वनिक्षेपक) यंत्र ? ते कसे विसरले गोखलेजी ? का त्यांचा कोटीखोरपणा कमी झालाय अलीकडे ?

■ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झुल्फिकार अली भुत्तो यांनी एका भाषणात शेख मुजिबूर रहमान यांच्यावर असा आरोप केला की त्यांनी सर्व दरवाजे, सर्व खिडक्या बंद केल्या आहेत.

पण भुत्तोसाहेब, पुढे होऊन दारावरची घंटी वाजवायला कोणाची हरकत आहे ?

■ पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांनी काँग्रेस अधिवेशनात सांगितले की मुख्यमंत्री भ्रष्टाचारी असला तर त्याला फाशी दिले पाहिजे.

म्हणजे आता फाशी देण्याचे खास प्रशिक्षण घेतलेल्यांच्या नोकरीची काळजी करायला नको.

■ केंद्रीय आरोग्यमंत्री उमाशंकर दीक्षि म्हणाले : स्थूलमानाने काँग्रेसवाले हे प्रामाणिक असतात.

पण ते प्रामाणिक, काँग्रेसवाले असतात ना !

■ कलकत्त्यात बिधननगरात भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे वर्णन एका वृत्तपत्राने 'जत्रा' असे केल्याबद्दल पंतप्रधानांनी नापसंती व्यक्त केली.

पंतप्रधानांची नापसंती योग्य आहे. त्या वृत्तपत्राचे चुकलेच. आमचे गाव मात्र शहाणे हं. गावात भरणाऱ्या एकवीरेच्या जत्रेला गावकरी हल्ली 'एकवीरेची काँग्रेस' म्हणतात.

■ बोर्डी येथे भरलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या अधिवेशनात ठाणे जिल्हा शिक्षण खात्याचे अध्यक्ष ठाकोरभाई शहा यांनी सांगितले : शिक्षणखात्यातील ४८ कर्मचाऱ्यांपैकी ३२ कर्मचारी महिला आहेत. त्यापैकी निम्म्या बाळंतपणाच्या

रजेवर असतात. यासाठी खात्यात पुरुष कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल.

पुरुष कर्मचाऱ्यांविषयीसुद्धा काही खात्री देऊ नका, शहासाहेब. काळच असा विपरीत आला आहे की ते देखील बाळंतपणाच्या रजेवर जातील; मग काय कराल ?

■ भारतातील पहिला दुमजली रेल्वे डबा पुढील वर्षी रेल्वे मार्गावरून धावू लागेल.

त्यात धोक्याची साखळी कोठे असेल याचा विचार करकरून काहीजण आत्ताच व्याकुळ झाले असतील.

■ आपण सी. आय्. ए. या अमेरिकन गुप्तहेर संघटनेचे सदस्य आहोत असे जाहीर करणारा बिल्ला अडकवून स्वतंत्र पक्षाचे खासदार पिलू मोदी लोकसभेत गेले होते. पुढे असे आणखी बिल्ले तयार करवून घेऊन ते विकायचा त्यांचा विचार आहे.

मग आमचाही त्यांना बिल्लू मोदी म्हणण्याचा विचार आहे.

■ वाघाला राष्ट्रीय पशु म्हणून मान्यता मिळाली आहे.

आता शिवसेनेला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता द्या, असा युक्तिवाद केला जाईल.

■ कलकत्त्यातील एका तरुणाने तब्बल अकरा वर्षे आपल्या डाव्या हाताचे एक नख काळजीपूर्वक वाढवले. त्याची लांबी आता दहा इंचावर गेली आहे.

कलकत्त्याच्या तरुणाचे डाव्याच हाताचे नख वाढणार.

हा पुरुषी नखरा !

■ श्री. पु. भा. भावे एका व्याख्यानात म्हणाले : अनेक मराठी नाटककार साहेबाचे मूल कडेवर घेऊन, त्याला तीट-काजळ लाऊन आपलेच बाळ म्हणून त्याला रंगभूमीवर आणतात.

आणि भावेअण्णांसारखे कुलीन नाटककार, आपलेच बाळ त्याला न शोभणाऱ्या भोंगळ कपडयात रंगभूमी-वर आणण्याचा अकुलीनपणा करतात. ●

## रविशंकरना काय म्हणावे ?

अमेरिकेतील सध्याच्या सर्वात प्रसिद्ध चार व्यक्ती कोणत्या असा प्रश्न निघाला तर उत्तरासाठी बहुधा पुढील चार नावे सांगितली जातील : १. रिचर्ड निक्सन २. हेन्री किसिंजर (अथवा किसिं 'ग 'र…) अगदी लहानसहान गोष्टींबद्दलसुद्धा आलेपाकवाले किती जागरूक असतात ते प्रिय वाचकांच्या लक्षात आले ना ?) ३. जॅकलिन ओनॅसिस ४. रविशंकर (हो हो आपलेच ते).

यापैकी रिचर्ड निक्सन आणि हेन्री किसिंजर ( ) यांच्याबद्दल सारे जगच जिथे बोलून राहिले आहे तिथे

आपण अधिक कशाला बोला? जॅकलिन ओनॅसिस हा विषय रंगीत आहे; त्याबद्दल सावकाशीने आणि चवीचवीने बोलले पाहिजे; आत्ता घाईत नको. रविशंकरबद्दल मात्र आत्ताच बोलायला हवे. कारण तो आपला माणूस आहे.

रविशंकर सध्या भारतात आले आहेत. एरवो भारताचे अनधिकृत सांस्कृतिक राष्ट्रदूत म्हणून त्यांचे वास्तव्य निक्सनच्या अमेरिकेत असते. अमेरिकेतील हवा रविशंकरना आणि त्यांच्या सतारीला मानवते. पण मायभूमीचे प्रेम तिचे लेकरू विसरू थोडेच शकते? त्यामुळे रविशंकरजींना मधून मधून ससतार भारतात यावेसे वाटते. आता तर कायम भारतात राहावे आणि येथील संगीतकलेला समृद्ध करावे असा विचार त्यांच्या मनात आहे, असे म्हणतात.

त्यात एकच अडचण मला (आणि रविशंकरना) दिसते: भारतीय रसिकता केवढी थोर. कार्यक्रमाला गेला तरी भारतीय प्रेक्षक-श्रोत्याची सविकल्प समाधी कधी ढळत नाही. रविशंकरनी हेच थोड्या कठीण शब्दात सांगितले: त्यांच्या मते भारतीय श्रोत्याला मैफिलीत कसे वागावे हे समजत नाही.

आता या रविशंकरना काय म्हणावे? निवांतपणे सतारीच्या तारा खाजवत बसायचे सोडून (चकचकीत पैसे मोजून आलेल्या) श्रोत्यांना सद्वर्तनाच्या रीतीभाती शिकवायच्या म्हणजे काय? व्यक्तिशः मला तर हे अगदी सहन होण्यासारखे नाही. मी बुवा गाणेबजावणे ऐकता ऐकता किंवा नाटक-सिनेमा-तमाशा पाहता पाहता शेजाऱ्याशी वा शेजारणीशी व्यवस्थित गप्पा मारतो, मोठमोठ्याने सुस्कारून किंवा देह गदागदा हालवून दाद देतो, वेफर्स खातो आणि वेफर्सपेक्षाही चुरचुरीत असलेला कागद पुन्हा पुन्हा चुरगाळण्याचा लाडिक चाळा करतो, गाण्याबजावण्याची धून स्वतःशीच पण इतरांना सहज ऐकू जाईल अशा बेताने गुणगुणतो किंवा नाटक-सिनेमात पलीकडे जे दिसत असेल त्यावर रनिंग कॉमेंटरी करतो. उशिरा गेल्याशिवाय तर माझे मुळीच चालण्यासारखे नाही. कारण मला माझी जागा शोधून काढायची असते; आणि त्यामुळे इतरांना ती शोधावी लागत नाही.

एका गोष्टीचे मात्र माझे मलाच आश्चर्य वाटते: दुसरा कोणी माझ्यासारखा वागू लागला म्हणजे मला भारी संताप येतो. तो का? पण दुसऱ्याचे गैर वागणेही मला एक वेळ चालेल; पण माझ्या वागण्याबद्दल दुसऱ्या कोणी टीका करावी हे मला कदापी चालणार नाही. मग तो दुसरा कोणी रविशंकर असला म्हणून काय झाले?

—अनंतराव

## तीस लाख लोक. प्रत्येकाचे किमान आठ आणे म्हणजे पंधरा लाख

# केरळ वार्तापत्र

चंद्रकांत अंबाडे, मद्रास.

शाळेत असताना मास्तर शिकवायचे— निसर्गाचा नियम — झीज आणि भर — एका ठिकाणी झीज झाली की विरुद्ध ठिकाणी भर होणार. मास्तर उदाहरण देत असत नदीचे. डोंगरामधून वहाताना डोंगराची झीज होते पण त्याच गाळामुळे पठारावर भर पडते वगैरे वगैरे! तेव्हा वाटायचं— कशाला हे शिकायचं? प्रत्यक्ष जीवनात ह्याचा काय उपयोग? पण आज ते पटले आहे. रोजच्या जीवनात पावलोपावली झीज आणि भर अनुभवतो आपण. हॉटेलात बिल दिले की, खिशाची झीज होते, पण पोटात भर पडते. भाजी घेतली की, त्याची टोपली कमी होते, पण त्याच्या खिशात भर पडते. नवीन साडी घेतली की पैशाची झीज होते, पण कपाटाची भर होते. पुस्तक घेतले, ज्ञानात भर पडते. देवापुढे पैसा टाकला की, पुण्यात भर भर पडते...हां, थांबा जरा! पुन्हा बोला प्लीज!

देवापुढे पैसा टाकला की खिशाची झीज होते, पण भर कुठे? तुमच्या क्रेडिटला असणारे पुण्य, त्यात भर, मग स्वर्गात सीट रिझर्वड् हे सारे आपल्याला तरी निदान ठाऊक नाही. ठाऊक आहे एकच. पैसा टाकला की भर झाली देवबाप्पाची म्हणजे त्याच्या दूतांची, म्हणजेच देवस्थानाच्या कमिटीची, संबंधीत मंडळीची आणि थोडीफार पुजाऱ्याची. हे सारं ओळखूनच की काय केरळमध्ये सर्व देवांचे झाले आहे 'राष्ट्रीयकरण'—फार फार वर्षांपूर्वीच त्या 'कार्पोरेशन'ला नाव आहे 'त्रावणकोर देवसम् बोर्ड'! सध्या बोर्डाच्या अधिपत्याखाली आहेत १२०० देवस्थानांमधील २४०० देव आणि त्यांच्या २४०० देव्या, सर्व पुजारी वर्ग, कारकून आणि झाडलोट करणारे सुद्धा. देवासमोर टाकलेला पैसा सरकारजमा होणार व पुजाऱ्याला दरमहा पगार सरकारच देणार! मोठ्या आशेने, एक नया पैसा घेवून मी यंदा केरळात गेलो.

महाराष्ट्राचे दैवत जसे पंढपूर तसे

# आणि या देवस्थानचे हिशेब हायकोर्ट तपासते म्हणे !

केरळाचे शबरीमलै. जसा आमचा विठूराया, तसा त्यांचा अय्यप्पा. पंढरीची वारी वर्षातून दोनदा, तशी अय्यप्पाचीही दोनदा ... डिसेंबरात मंडळपूजा व जानेवारीत संक्रांतीला 'मकर विळक्यै' — यंदाची एकूण यात्रा किती भरली असावी ? डिसेंबरात १५ लाख व जानेवारीत ११ लाख, मिळून सुमारे २६ लाख लोक अय्यप्पाचे दर्शनास गेले...व्रत सांभाळून...अय्यप्पास जायचे म्हणजे ६० दिवस केस न कापणे, दाढी न करणे, संपूर्ण शाकाहार, पूर्ण ब्रह्मचर्य, काळीच लुंगी वापरणे, गळ्यामध्ये तुळशीमाळा हे व्रत पाळावे लागते. यंदाच्या लाखो केरळवासीय यात्रेकरूंमध्ये पुण्याच्या सदाशिवपेठीच्या "माणूस"चाही एक 'माणूस' सामील झालेला होता...काळी लुंगी अन् वाढलेली दाढी...तोंडाने इतरांप्रमाणे जप 'स्वामीये शर्णम् अय्यप्पा किंवा सामीये । अय्यपो'

कोट्टायम हे शेवटचे रेल्वे स्टेशन. तेथून चालकायम् पर्यंत बस आणि पुढे दहा मैलांचा डोंगर पायी चढायचा ... अक्षरशः डोक्यावर सामान घेवून ... सिंहगडची पायवाट जशी तस्साच न बांधलेला.. लाखो यात्रेकरूंच्या जाण्याने आपोआप तयार झालेला. घनदाट कीर्रर जंगलामधून...सागाच्या रबराच्या उंच वृक्षांमधून, डोंगरकड्यावरून ! हे सारे कमी म्हणून जंगली हत्ती, वाघ, रेड्यांचे भय...ते दूर पळावेत म्हणून फटाके वाजवायचे. मी सहज एकाला विचारले "ह्या जंगलात माकडे दिसत नाहीत ते" — तो चटकन् म्हणाला "आपण सारेजण आहोत की !"

खूप दमल्याने वाटेतल्या झोपडीवजा हॉटेलात चटईवर टेकलो. घोटभर गुळमट काळे पाणी उर्फ बिनदुधाची कॉफी ४० पैसे, एक केळ २५ पैसे, एक इडली ४० पैसे, पनामा सिगरेट पाकीट २.१० पैसे, काड्यापेटी २०, सोडावॉटर बाटली ४० पैसे...बिल देताना गल्लेवाल्याला मल्याळम्मधे हसत विचारलं "भाव कमी लावलेत आज ?" त्यावर त्याने दिलेली माहिती थक्क करणारी होती. त्या कीर्रर जंगलातील पायवाटेच्या बाजूला झोपडेवजा खोपडी उभी करून यात्रेच्या महिन्यापुरता धंदा करण्याच्या हक्काचा देवस्थानने लिलाव केला होता. दहा मैलाच्या अंतराचा लिलाव करून फक्त सात लाख रुपये (?) देवस्थानने मिळविले होते. तो लिलाववाला वेडा नव्हता...वीतभर खोपटाचे भुईभाडे ३५ रु. रोजी होते. शिवाय जंगलखात्याला ५० रु. चे चलन भरणे निराळेच...चहासाखर गाढवाचे पाठीवर लादून आणायचे ... दुधाची तीव्र

टंचाई. मनात म्हटलं "तुला काळा-बाजार करण्यास प्रेरणा अय्यप्पाचीच तर"

अर्ध्या टप्प्यावर लागते पंबा नदी. प्रभूरामचंद्राला सीता शोधताना हनुमान इथेच प्रथम भेटला.. वाळवंटात बांबू रोवून वर हिरवागार पाला टाकून केलेल्या १०×१०'×५' आकाराच्या झोपड्या...भाडे एका रात्रीसाठी वीस रुपये...कारण वाळवंटाचाही असाच लिलाव केलेला होता. नदी नावालाच वहात होती, कारण 'पंबा प्रॉजेक्ट' धरणामुळे पाणी अडविले गेले होते. नदीवरचा पूल जेमतेम ४ माणसे पायी जाण्याइतपत रुंद अन् लाकडाचा... एका टोकावरच्या दगडावर अक्षरे दिसली. १९६३ उद्‌घाटन व्ही. बी. गिरी यांचे हस्ते...मी भयंकर दाटीने आपोआप ढकलला जात होतो अन् मनातल्या मनात आकडेमोड करीत होतो... दरसाल ३० लाख लोक येणार अन् परतही जाणार...म्हणजे ६० गुणीले दहा वर्षे...किती लोक गेले असतील बरं ?...देवस्थानच्या एकाला विचारलं "तो पूल सिमेंटचा बांधून रुंद केला तर ?" त्याने पट्‌दिशी मला उडवून लावले "ती PWD खात्याची जबाबदारी आहे" मी चिडून ओरडलो चोरा, वाळवंटाचा 'लिलाव PWD करते का रे ?"—पण तो ऐकायला तिथे असेल तर ना ?—माझा झोपडीमालक म्हणाला "जेवढी रक्कम लिलावात तेवढीच वरती ह्या लोकांना, मग भाडं कसं कमी घेणार ?"

सातव्या मैलावर 'शबरीपीडम्'— येथेच रामाला शबरीने उष्टी बोरे दिली होती. आज तिथे कसलीच खूण नाही. कॅमेरा परत आत ठेवून दिला. प्रत्येक यात्रेकरू झाडाखालच्या त्या दगडावर नारळ फोडीत होता...बाजूच्या झोपड्यांत नारळ विकत घेण्यास गेलो. बऱ्यापैकी नारळ म्हणे एक रुपाया... चटका बसल्याप्रमाणे परत ठेवून दिला. ...कोकणात नारळ फुकट मिळतो तर केरळात नक्कीच दोन फुकट मिळायला नकोत का ?...फुटलेली नारळे परत कुणी घेत नव्हते. तेथे उभे असणारे गडी ती टोपल्यांमध्ये जमा करीत होते. ...मी त्याला विचारलं—

'ह्या हक्काचा लिलाव तुम्ही घेतलाय वाटतं ?'

'सबंध देवळाचा अन् इथला तिथला सगळा.'

'केवढ्याला ?'

'दोन लाख सहा हजाराला.'

मी शांतपणे पुढे सटकलो. मुख्य देवालयास 'सन्नीधानम्' हे नाव आहे. दर्शनास प्रचंड गर्दी . रेटारेटी...धक्काबुक्की...देवळात शिरताना अठरा पायऱ्या... तुमचे यात्रेचे जितके वर्ष असेल, त्या पायरीवर नारळ फोडून आत जायचे...मी पहिल्या पायरीवर फोडला...दोन्ही तुकडे त्या दोन लाखवाल्याच्या माणसाने फावड्याने ओढून घेतले. परतताना पुन्हा त्याच पायरीवर फोडून देवाकडे पाठ न करता उतरायचे.

देवापुढे ठेवायचा प्रसाद आधी

तिथल्या कारकुनाकडे ठेवायचा. तो प्रसादाचा आकार बघून तिकिट सांगे. मिनिमम् आठ आणे...विशेष मोठ्या भांड्यास २५ रु. तिकिट...अर्धा प्रसाद देवाला, अर्धा परत तुम्हाला...बाहेर लाखो यात्रेकरू दाटीवाटीने बसलेले... डोंगराच्या उतारावर हिरव्या बांबूच्या झोपड्या...बसून आत जायचं. आतून आकाश मस्त दिसणार. पाण्यासाठी झोपडीवजा एका हॉटेलात गेलो, त्याने सरळ दूरवर बोट दाखवले. गर्दीतून धक्काबुक्कीतून तेथे पोहोचलो. पाण्याच्या दोन तोटया. त्यावरच सर्वांची झुंबड, तेथेच सारे कार्यक्रम. दोन तासांच्या झटपटीनंतर तांब्याभर पाणी मिळाले. तेवढ्यात दात घासणे व अर्धे पिणे...प्रातःकाळच्या प्राथमिक गरजेसाठी एक हातरुमाल...दोन दिवसांचे दोन करचीफ गेले. आंघोळ अर्थातच नाहीच. पारोशाने देवाला जायचं कसंतरीच वाटलं. बरोबरचा मित्र म्हणाला 'इथे सारे तसच करतात दरवर्षी. अय्यप्पाला चालतं.'

देवापुढचा पुजारी वृद्ध...ऐसपैस देहाचा...लोक आपण होऊन नोटा त्याचे समोरचे घंगाळात फेकीत होते... तो अंगारा देत होता. चौकशी करता समजले त्याचा दरमहा पगार शंभर सव्वाशे असेल, पण ह्या एकाच महिन्यात ३।४ लाख तो कमवून जातो... अर्थात संबंधित मंडळींना हप्ते दिल्यावर एखादा लाखच उरतो म्हणे. मी विचार करीत होतो. देवस्थानला ३० लाख लोक...प्रत्येकाचे किमान तिकिट आठ आणे धरले तरी पंधरा लाख इथेच जमले. शिवाय लिलावांचे निराळेच. सोयी मात्र शून्य...पिण्याचे पाणी बघायलाही दुर्मिळ. धर्मशाळा नाहीत. रस्ता बांधलेला नाहीच...हे पैसे जातात तरी कुठे...केरळातील देवस्थानांचे हिशोब हायकोर्ट तपासते म्हणे.. मी भानावर आलो तेव्हा यात्रेकरूंच्या त्या लोंढ्यात वहात वहात देवळाबाहेर आलो होतो. नमस्कार करायचाही विसरलो होतो आणि तो नवा पैसा टाकायचाही विसरलो होतो. माझी झीज झाली होती, पण क्रेडिटला पुण्याची भर पडली नव्हती!

• • •


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन
गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०.

## ना. भाऊसाहेब वर्तकांच्या जिल्ह्यातील

# हिरवळ आणि होरपळ

### एक

पाटकरांची क्रांती, ना. दा. ठाकरसींची कल्पना यांच्या पाठोपाठ रूइयांची जया आता दार्मखिडमध्ये आली आहे. तिला सुद्धा पाणी हवे आहे. काहीतरी करायचंय, खूप तहान लागली आहे. पहिल्या दोघींना आता पाण्याची अडचण नाही आणि आता जयालासुद्धा काळजी करायचे कारण नाही. थोडा धीर धरला तरी पुरे आहे. आणखी खोल जायला हवंय, आणि खोलात गेल्याशिवाय कुठले पाणी म्हणा!

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे स्वातंत्र्याच्या पंचविसाव्या वर्धापनवर्षानिमित्त मुंबईच्या कॉलेजेसनी आसपासच्या खेड्यांमध्ये पंचवीस विहीरी उभ्या करायच्या असा संकल्प सोडला आहे. माटुंग्याच्या रामनारायण रूइया कॉलेजनेही दार्मखिड या पालघर तालुक्यातील गावात विहीर खणायला सुरुवात केली. नाताळच्या सुटीत शिबीर घेऊन पन्नास विद्यार्थी विद्यार्थीनी आणि पाच प्राध्यापकांनी तब्बल चाळीस फूट व्यासाच्या वर्तुळात साडेपाच फूट खोल खणले आहे. विहीर सामुदायिक मालकीची असेल. हिच्यासाठी सेवा योजनेतर्फे काही रक्कम मुक्रर झाली आहे. तसेच कॉलेजच्या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळानेही काही निधी जमा केला आहे. यापुढे गावातील लोकांना मजुरी देऊन पाहिजे तेवढे खोल जायचे आहे. पुढील मोसमापूर्वी ही विहीर साऱ्या जाम्यानाम्यानिशी पूर्ण करायचा मानस आहे.

ऑक्टोबरमध्ये प्रा. नांदुर्डीकरांनी एक दिवस बोलावून घेतले. 'दिलीप





तुझे भूमिपुत्र प्रतिष्ठान ' बद्दलचे लिखाण वाचले, आपल्या कॉलेजतर्फे नाताळात एक विहीर खणायची आहे, ती ' भूमिपुत्र 'च्या प्रकल्पावर घ्यावी असे सुचले,' ते म्हणाले. 'कॉलेज इज मोस्ट वेलकम अॅट अवर प्रोजेक्ट, सर, मी माझ्या परीने होईल तितकी मदत करेन'. मी म्हटले. प्रा. नांदुर्डीकरांनी प्राचार्य रा. अ. कुलकर्णींना भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या प्रकल्पाबद्दल माहिती सांगितली. या ट्रस्टच्या कार्याला कोंढाण व दामखिड या गावांमध्ये सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी भूमिहीनांना जमीन मिळते. त्याकरिता विविध स्तरांवर चळवळी होतात, परंतु पुढे मिळालेल्या जमिनी किफायतशीररित्या कसण्याची साधने उपलब्ध करून घेण्यासाठी व्यवस्था करणाऱ्या व मार्गदर्शन देणाऱ्या समर्थ सस्था नसतात. जमीन मिळालेला शेतकरी जिथल्या तिथेच राहतो. आपल्या हक्कांसाठी सघर्ष करायचे बळही त्याच्या अंगात येत नाही. या मनोर भागात काळूराम धोदडे याच्या नेतृत्वाखालील भूमुक्ती आंदोलनामुळे कोंढाण व दामखिडच्या कुळांना जमिनी परत मिळाल्या पण त्या तशाच पडून राहू लागल्या. येथे काम झाले पाहिजे अशी लोकांमध्यं गरज निर्माण झाली. भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या तीन विश्वस्तांपैकी एक श्री. आवा करमरकर गेल्या मे महिन्यापासून या गावात येऊन राहिले. दोन्ही गावात प्रत्येकी एक एक विहीर खोदण्यासाठी ग्रामपचायतीतर्फे रोजगार हमी योजना राबवण्यास आरंभ झाला. गावकऱ्यांना रोजगार मिळू लागला. उपाशीपोटी मजुराला सावकार दुकानदाराच्या भेसळयुक्त आटचापासून वाचवण्या-

करिता गव्हाच्या स्वरूपात दाणेदार मजुरी दिली, असमतोल व अपुऱ्या आहाराने करपून गेलेले चेहेरे तुकतुकी घेऊन उभे राहिले. विहिरीही भरपूर पाण्याचा जिवंतपणा घेऊन वर आल्या. पावसाळा सुरू होण्यापूर्वी बांधून घेतल्या गेल्या. दरम्यान काही शेतांची बांध-बदिस्ती उरकली गेली होती. आबां-बरोबर आलेले पंधरा-वीस विद्यार्थी-युवक उन्हाळ्याची सुटीभर राहिले. दिवसभर विहिरींचे काम स्पीड अप् करायचे, मजुरी देण्यासाठी बांधांची मापे घ्यायची, शेतजमिनींचा सर्व्हे करायचा, त्याचे नकाशे तयार करायचे. सायंकाळी विचार-चर्चा चाला-यच्या आणि त्याच बरोबरीने पुढील कामांची आखणीसुद्धा. आबा कर्नलच्या थाटात नकाशे पुढे घेऊन या शेतात 'तायचुंग' जाईल, या तुकडा नंबर-मध्ये 'आय. आर. आठ' जाईल असे ठरवत दारिद्र्याशी खेळायच्या या युद्धाची आखणी करायचे. आता एकरी-दोनशे ते तीनशे किलो हा उत्पन्नाचा आकडा विसरायचा. या मोसमात आपले एकरी दोन हजार किलो भात पिकवायचे लक्ष्य आहे असे आबा सांगा-यचे. शेतकऱ्याच्या बोकांडी बसणाऱ्या सावकाराच्या द. सा. द. शे. बाराशे वगैरे दरांनी दिलेल्या कर्जांचा विचार न करतासुद्धा आपल्याकडील भातशेती एकरी सुमारे शंभर रुपये तोट्यात जाते. शेती हा प्रमुख व्यवसाय असलेल्या आपल्या देशात आपण हे सहन करणार आहोत का? आधुनिक तंत्राने मशागत करून, नवीन बियाणे वापरून एकरी जवळजवळ पाचशे ते सहाशे रुपये नफा मिळवणे सहज शक्य आहे. आपल्याला पाच एकराच्या आतल्या शेतकऱ्याला त्यांच्या पायावर उभे करायचे आहे. त्याची गरज भागल्यावर उरलेल्या रकमेचे भांडवल त्याने पुन्हा उत्पादना-साठी गुंतवायचे आहे. शेतकरी मंडळाला राष्ट्रीयीकृत बँकेकडून कर्ज मिळवून द्यायचे काम 'भूमिपुत्र'ने केले. हे कर्ज फेडायची जबाबदारी शेतकऱ्यांची स्वतःची. ते निश्चितपणे फेडले जाईल हे पहायचे काम भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या ट्रस्टींचे आणि संबंधित युवकांचे. यावर्षी शेतकरी मंडळातर्फे गवताचा व्यापारही हाती घेण्यात आला. उत्पादकाने ग्राह-काशी थेट संबंध जोडायचा. लोणी मटकावणारे दलाल आम्हाला नकोत. वर्षानुवर्षे डावलल्या गेलेल्या आदिवासी समाजाला वर यायला मदतीचे हे बोट आहे. हे करताना प्रस्थापित राजकीय पक्षांच्या हातचे बाहुले बनायचे नाही, त्यांच्या निवडणुकांच्या गदारोळापासून दूर रहायचे आहे. समानसंधी, समान वाटप, समता वगैरे गोष्टी केवळ घोषणा देऊन येणार नाहीत. सांस्कृतिक क्रांती करायची तर तिला रचनात्मक कार्याचा ठोस पाया हवा. तो द्यायचा भूमिपुत्र प्रतिष्ठानचा प्रयत्न आहे आणि या कार्यक्रमात सुशिक्षित युवकांचा अंत-र्भाव असल्याने तो सफल होणे शक्य आहे—ही सर्व पूर्वपीठिका लक्षात घेऊन प्राचार्यांनी प्रकल्प पहायची इच्छा दर्शविली. दिवाळीच्या सुटीत एक दिवस

त्यांना दामखिडला घेऊन गेलो.

त्या वेळी पाटकर कॉलेजची तीस मुले-मुली व ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या पन्नास कन्यकांकडून दोन विहिरी खणल्या जात होत्या. बेल बॉटम, जीन घातलेली पोरे चक्क घाम गाळीत होती. रुइया कॉलेजच्या संभाव्य विहिरीची जागा आबांनी दाखवली. येथे निश्चितपणे पाणी लागेल का असा प्राचार्यांचा प्रश्न होता! आबांनी उत्तर दिले की, सहा फुटावर नाही तर आठ नऊ फुटावर लागेल, पण पाणी लागणार हे नक्की. या भागात पाणी भरपूर आहे असा अनुभव आम्हाला आला आहे. आतापर्यंत पंचवीस वर्षांत कोणी ते बाहेर कसे काढले नाही हे आश्चर्य आहे. जागोजागीच्या या शिळा टिकावफावडी लागली की जिवंत होतील. पण पदस्पर्श करणारे रघुनाथ हवे आहेत. असो. कॉलेजच्या एका शिबिरात मुले काही ही तलाव वजा विहीर पूर्ण करू शकणार नाहीत, पुढे गावकरी रोजावर काम करून ती पूर्ण करतील. पावसाळ्यामध्ये ही विहीर पाण्याचा साठा करणारी टाकी बनेल. पावसाने ऐनवेळी दगाबाजी केली तर पंप चालवून शेतीला पाणी पाजता येईल. उन्हाळ्यात रबी पीक घेता येईल. इथे जे काम सुरू झाले ते दोन विहिरी खणूनच. पावसाळा कोरडा गेला. पण पिकांना कोरड पडली नाही. रत्ना व संजीवनी या विहिरींनी शंभर टक्के सहकार्य दिलं—' चला आता कोणकोण मुले येणार त्याची यादी तयार करायला लागू ', प्राचार्य कुलकर्णींनी आबांचे म्हणणं ऐकल्यावर आनंदी सुर लावला.

तेवीस डिसेंबरच्या टळटळीत दुपारी दामखिडच्या एका करड्या माळावर एस. टी.ची लालभडक गाडी येऊन थडकली. मुंबईच्या गर्दटलेल्या इमारती व जाडजूड रस्ते पहायची सवय असलेले गॉगल्समागचे डोळे आता विरळ विरळ रचलेल्या झोपड्या आणि चिटुकल्या पाऊलवाटा पहात भिरभिरू लागले. हे छोटेसे गाव डोंगराला निमूटपणे टेकून बसलेले आहे, मधूनच कवड्याचा आवाज शांततेवर टकटक करून जातोय. एका बाजूला सागाचे सरळसोट जंगल व दुसऱ्या बाजूला वेडीवाकडी पसरलेली भातखाचरे पाहताना खूप हलके वाटतेय..मनात येतय की आजपासून इथे श्रमाचे काम करायचेय. सरांनी सांगितलेय की इतर कॉलेजेसपेक्षा आपले काम जास्त व्हायला पाहिजे. कबूल, पण काम करून उरलेल्या वेळात उनाडायलाही मिळाले पाहिजे. ॲडव्हान्सपार्टीने दोन दिवसापूर्वीपासूनच तंबू वगैरे उभे करायला सुरुवात केली आहे. उरलीसुरली बांधणी पुरी करून तंबूत सामान टाकले जातेय. शिबिरातील व्यवस्था एकदम कडक आहे.

आल्या दिवशी सायंकाळपासूनच कामाला सुरुवात झाली. नाश्त्याची वेळ वगळून सकाळी साडेसहा ते दुपारी साडेअकरा आणि सायंकाळी साडेतीन ते साडेपाच एवढा वेळ अंगमेहनत होत होती. मातीचा पहिला थर खणल्यानंतर अतिशय कठीण मुरूम लागला.

'हे जोश 'चे नारे लावत, 'दॅट्स द स्पिरीट 'च्या आरोळ्या देत टिकाव-फावड्यांच्या खणखणाटात घमेली भरभर चालली होती. पहारीने खणलेले 'द्रोणागिरी' वाहून नेले जात होते. प्रा. साहूराजा स्वत: खूप काम करीत होते तसेच प्रोत्साहनही खूप देत होते. काम सुरू करायच्या ठीक वेळेवर जशी शिटी मारायचे तसेच संपायच्या अचूक वेळलाही त्यांची जोराची शिटी व्हायची त्यामुळे पोरे त्यांच्यावर निहायत खूष.पाच हजार घमेली वगैरे आकडे ठरवून तेवढे काम तेवढ्या वेळात उरकायचे असा चंग मुले रोज बांधत. टेम्पो जबरदस्त होता.

एक दिवस आबांचे मुलांपुढे भाषण झाले. दामखिडमध्ये येऊन विहीर खणणे हे निमित्त आहे. रुइया कॉलेज आले नसते तर या दरिद्री भागात ही विहीर झाली नसती, गावकऱ्यांना शेतात अधिक रोजगार निर्माण व्हायची शक्यता कमी झाली असती. एक विहीर खणली की येथे किमान तीस एकरातली खरीप भातशेती व दहा एकरातली रबीची पिके यांची पाणी पुरवठ्याची हमखास सोय होते. अशा कमीतकमी वीस विहिरी खणून कोंढण व दामखिड ही गावे सुजलाम करायचा बेत आहे. तरीही केवळ विहिरी खणायला सुरुवात करणे हा उद्देश नाही. विद्यार्थ्यांचा ग्रामीण भागाशी संबंध यावा आणि अंगमेहनतीची सवय व्हावी या कल्पनेतून राष्ट्रीय सेवा योजना कार्य करू लागली आहे. त्याही पलीकडे जाऊच सर्वव्यापी विचाराने सातत्याने काम करीत सामाजिक पुनर्रचनेची अपेक्षा आपण बाळगली पाहिजे. खेड्यापाड्यांमध्ये वीतभरचिंध्यांआड उघडे पडलेले दारिद्र्य पाहून स्वस्थ बसायचे नाही, हे दारिद्र्य हटवायचे आहे. चारचार दिवस सक्तीने लादल्या गेलेल्या उपासमारीची नुसती कणव येऊन भागणार नाही. मोठ्या उद्दिष्टांसाठी मोठे बदल करायची अपेक्षा बाळगताना अगोदर या आदिवासीच्या पोटाची व्यवस्था करायची आहे. भूमिपुत्र प्रतिष्ठान त्यासाठी अधिक उत्पादनाचे कार्यक्रम हाती घेऊन राहिले आहे. येथील माणसाला शेती हा फायदेशीर धंदा म्हणून करण्यास शिकवणे चालू आहे. गेल्या मोसमात हे प्रयत्न आवश्यक तेवढे यशस्वी झाले आहेत. हरितक्रांतीचा रस्ता आपण गरिबांच्या झोपडीपर्यंत पोहोचवू शकतो असा आम्हाला आत्मविश्वास आला आहे. यापुढे त्याला दुग्धव्यवसायासारखे पूरक धंदेही द्यायचा बेत आहे. त्याचबरोबरीने त्याची उदासीनता कमी करणे, शिक्षणाचे महत्त्व पटवणे या गोष्टीही सुरू आहेत. या सर्व कामामागची प्रेरणा काय असे कोणी विचारले तर 'सुशिक्षित युवक' असे उत्तर आहे. युवकांनी आपली अतिरिक्त शक्ती रंजल्यागांजल्या माणसाचे भले करण्यासाठी द्यावी आणि दारिद्र्य-उपासमारीचे आव्हान पेलता पेलता आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करून घ्यावे. 'भूमिपुत्र 'तर्फे गेल्या मे महिन्यात घेतलेल्या शिबिरात आलेले मुंबईचे काही कॉलेज विद्यार्थी दर

मोठ्या सुटीत व शनिवार-रविवारच्या रजेत दामखिंड व कोंढाणमध्ये आपणहून येऊन अधिकाधिक रस घेऊन काम करीत आहेत. आर्थिक, सामाजिक व राजकीय अशा तिन्ही कोनातून परिवर्तनाचा विचार करता करता मातीत हात घालून श्रम करायची सवयही त्यांना लागली आहे. परिस्थितीपालटासाठी मन तयार होणे व ठिकठिकाणहून बदल घडवून आणणारी माणसे तयार होणे ही नितांत गरज आहे. विहीर खणायच्या निमित्ताने आलेल्या युवक-युवतींनी या प्रयत्नात सामील होत रहावे.

काम करताना मदतीला आलेल्या गावकऱ्यांच्या सन्मानासाठी शिबिराच्या शेवटच्या दिवशी रात्री उत्साहाच्या बहरात जेवण आयोजित केले होते. याच वेळी, या विभागात शिबिरे घेणे हा कॉलेजच्या दर सुटीतला कार्यक्रम बनवायचा आपला मनोदय प्राचार्यांनी जाहीर केला. ग्रामपंचायतीकडून जागा मिळवून एक शेड उभारायची. त्यात खोदकामाची हत्यारे व स्वयंपाकाचे सामान ठेऊन द्यायचे. सुटी झाली की, मुलांनी उठून साठ मैलांवर यायचे आणि काम करायचे बस् ! अंगमेहनत करायची ती समाजाच्या अंगी लागेल अशा ठिकाणी करायची.

पाटकर कॉलेजतर्फे खणलेल्या विहिरीचे नाव ठेवले गेले आहे 'क्रांती'. एस. एन. डी. टी. ची विहीर 'कल्पना' आणि आता जिच्या आसपास 'जया' जातीच्या संकरित भाताची लागवड करायची ती ही रुइया कॉलेजची 'जया.' सुशिक्षित युवक-युवती खेड्यातील सामान्य माणसाच्या जवळ जात आहेत. न जाणो काही जणांना परिवर्तनाची निकड पटेल आणि ती विचारप्रवृत्त होतील. याच मुलांमधून सामाजिक क्रांतीसाठी स्वतःला कुर्बान करणारे कल्पक कार्यकर्ते निर्माण होणार नाहीत कशावरून ? कशावरून याच विहिरींचे जिवंत झरे उद्या सोन्याचे विस्तृत रान फुलवणार नाहीत ?

—दिलीप जोशी

---


# दोन

---

१–४–१९५७ म्हणजे महाराष्ट्राच्या शेतकी जीवनातील महत्त्वाचा दिवस. या दिवशी कसणारा कूळ जमिनीचा मालक झाला. भूमिसुधार पथावरील एक महत्त्वाचा टप्पा या दिवशी महाराष्ट्राने गाठला. कुळाने मालकाला जमिनीच्या मोबदल्यात किती कमाल आणि किमान रक्कम द्यावी याची कायदेशीर तरतूद करण्यात आली तीही याच दिवशी. सारजामोरीचा लक्ष्मण डोमा दिवा हा वारली याच दिवशी इतर कुळांप्रमाणे जमिनीचा



# तुमचं सोनुलं



लाडकं मूल. त्याच्यासाठी तुम्हांला जास्तींत जास्त झटावसं वाटतं. पण जास्ती मुलं झालीं तर हें जमूं शकेल ?

पहिल्या मुलानंतर ३ वर्षांनी दुसरं मूल. जवळच्या कुटुंब कल्याण-नियोजन केंद्राला भेट द्या.

davp 78/80

मालक झाला. त्याच्या जमिनीची किंमत ठरली. १९६८ साली त्याने पूर्ण किंमत भरून मालकी सर्टिफिकेट घेतले आणि १९७१ साली वसईच्या मामलेदाराने कुळाकडील जमीन मालकाचीच आहे असा निकाल दिला. दिनांक १-७-७२ च्या 'माणूस'ने हा विचित्र निर्णय उजेडात आणला आणि कलेक्टरनी कागद मागवून घेतले व रिव्हिजन अपील दाखल केले. त्यात लक्ष्मणला न्याय मिळाला.

आता या सारजामोरीला आणखी जरा बारकाईने नजर फिरवा. लक्ष्मणच्या मालकाची अफाट जमीन दिसेल. ही त्यातील काही कुळे पहा. बाबू सिदू भोईर (नवबौद्ध), लडक्या भोईर (नवबौद्ध), रमाकांत पाटील (आगरी) यादव हडळ (वारली), आत्माराम दळवी (वारली), महाद्या दिवा (वारली). आणखी दोन-चार आदिवासी कुळे.

गेल्या ४०।५० वर्षांपासून यांच्या हाताखाली जमिनी आहेत. १-४-५७ ला त्या जमिनींचे कुळ म्हणून रेकॉर्ड ऑफ राईटला त्यांची नोंद आहे. सरकारच्या डिटेल लिस्टमध्ये त्यांची नावे झळकत आहेत. जमिनी या घटकेपर्यंत त्या कुळांच्याच ताब्यात आहेत. त्यांनी तसे स्पष्ट जबाब भिवंडी प्रांत अधिकारी श्री. यशवतराव साळवी यांचेकडे गेल्या १॥ महिन्यापूर्वी नोंदविलेतही. पण १७-१२-५८ रोजी असाच एक मामलेदार मालकाच्या ताब्यात राहणारा वसईला आला आणि १-४-५७ रोजी मालक झालेली ही कुळे त्याने रेकॉर्डमधून नष्ट केली. कुळांचे बेकायदा फसवून घेतलेले जबाब रेकॉर्डला ठेवून दिलेत. कुळांकडे कबजे असल्यामुळे कुळांना या फिरवाफिरवीची काही कल्पना नव्हती. धूर्त मालकाने त्या जमिनी अन्य सावकारांना विकण्याचा सपाटा चालविला आहे. जमीन हाताखालची जाईल म्हणून कुळे घाबरून गेली आहेत. कोर्टदरबार करण्यात मालकाची जात पटाईत असते. बिचारी गरीब कुळे-त्यांना कोर्टदरबार करावयाला कोण मदत करणार? मोठ्या आशेने या कुळांनी आपल्या तालुक्यातून निवडून दिलेल्या आणि महसूल मंत्रीपदावर आरूढ झालेल्या ना. वर्तकांकडे न्याय मिळावा म्हणून लिहिले. पण हुद्दा जेवढा मोठा तेवढा वशिलाही मोठा लागतो, ते या बिचाऱ्या कुळांना काय माहीत!!!

त्याच मालकाची ही येथून ३॥ मैलांवरील पाये या गावची जमीन पहा. अस्सल सुरती कोलम भात पिकणारी. ३० एकर जमीन स्वतःच्या पायाखाली ठेवून जवळपास ३० एकर जमिनीत हल्या वैती, सुक्र्या जाधव, जिव्या चिपाट वगैरे १८।२० आदिवासी कुळे गेल्या तीन पिढ्यांपासून कसणूक करीत आहेत. गेल्या तीन पिढ्यांत जग किती बदलून गेले याची जागमागदेखील या अभागी जीवांना कधी आली नाही. अगदी १९७१ पर्यंत. ही वारली कुळे मालकाला सराईवर पिकाची अर्धेली म्हणून निम्मा खंड देत


आहेत. मालक म्हणजे देव. त्याचे जवळ पावती कशी मागावयाची? आणि देवाने जमीन कुळाच्या नावे केली नाही तर त्याला हटकायचे तरी कसे? आता येथून ह्यायवे निघत आहे. जमिनींचे भाव वाढत आहेत. देव भगतांवर कोपू लागला आहे भगत जागा सोडून दूर डोंगर कपाऱ्यांच्या आश्रयाला धावत सुटला आहेत.

पायेपासून अवघ्या २॥ मैलावर पूर्वेकडे हा पायगाव. कुणा एका वारल्याची. या गावातील जमीन सावकाराने खाल्ली अशी ओरड वर्षापूर्वी ठाण्याच्या 'प्रतियोगी'ने मारली म्हणून सरकारने चौकशी केली. चौकशीत सरकारला समजले की ३५–४० वारली कुटुंबांच्या जमिनी सावकारांनी लुटल्या आहेत. म्हणजे फक्त एक दादू काथोड भोया हे वारली कुटुंब सोडल्यास सर्व वारल्यांच्या जमिनी सावकारांनी लुटल्या आहेत. कुळकायद्याने वारली कुळांना मिळालेल्या जमिनी कलेक्टरच्या परवान्यावाचून अन्य कुणाला घेता येत नाहीत. तो टेनसी आणि फौजदारी असा दोन्ही बाजूने गुन्हा होतो. पण खुद्द सरकारच्याच चौकशीत अशी गुन्हेगारी आढळून आली पण सरकार करणार काय? गुन्हेगार आहेत पुढारी, नेते. त्यामुळे अधिकारीवर्गाची मोठी पंचायत झाली आहे. 'नाजूक ठिकाणी दुखणे आणि जावईबुवा वैद्य' अशी स्थिती अधिकारी वर्गाची झाली आहे. या जमिनी लुटणाऱ्या मोठ्या सावकार कुटुंबातला एक जण आहे तालुकापंचायत सदस्य. गरिबी हटविण्यास निघालेल्या इंदिरा कॉंग्रेसच्या तिकिटावर बिचारा रितसर निवडून आला आहे. त्यामुळे काशीच्या भटाला जशी सर्व पापे माफ तसे या कुटुंबाला कसलेही पाशवी अत्याचार माफ आहेत. या कुटुंबाची पायगावला जमीन उणीपुणी ७–८ एकर आहे पण वर्षाला १॥ ते १॥। लाख रुपयांचे भात हे घराणे काळ्या बाजारात विकत असते. शिवाय जंगलच्या चोरट्या लाकडांचा धंदा आहे. रुपयाला महिन्याला चार आणे या भावाने व्याज बट्ट्याचा धंदा अंदाजे ३०–३५ वारली गावात चालतो. व्याजापोटी वारल्यांच्या बकऱ्या, कोंबड्या, गुरे, दारातील भाजीपाला यावर मालकी हक्क या कुटुंबाचाच चालतो. या कुटुंबाच्या परवानगीवाचून वारल्यांना स्वत:च्या कोंबडीला, बकरीला विकता किंवा मारता येत नाही. आता जरा हा लिलाव पहा.

## पायगावची खारूबाई

पायगावलाच खारूबाईची ११ एकर जमीन आहे. कोलम भात पिकणारी, नवरा अकाली मयत झाला. एकुलता एक पोर आहे. सावकार कुटुंबातील चारही भावांची नजर त्या विधवेच्या जमिनीवर खिळली. त्यांनी चक्क त्या बाईच्या नावावर दुकानाची उधारी दाखवून तिची कुळहक्काची जमीन लिहून घेतली. लिहून घेतल्यावर प्रत्येक भावाला त्या जमिनीची लालूच लागली. खरे म्हणजे खुद्द ती जमीन खारूबाईही कलेक्टरसाहेबांच्या परवान्यावाचून कुणाला देऊ शकत नाही पण नित्य-

पृष्ठ ५० वर



# स्वप्न

मोहिनी वर्दे

लांबवर क्षितिजापर्यंत माळरानाला एक भुरा रंग चढत होता. सुकलेली गवताची पाती जणू गरमीने धरतीला शहारा आल्यासारखी सरसरली होती. एखाद दुसऱ्या झुडपाशिवाय जिवंतपणाची झाक ट्रकच्या काचेतून रघूला कुठेच दिसत नव्हती. समोरचा वेडावाकडा रस्ता मुंगुसाने साप गिळावा तशी त्याची ट्रक गिळून टाकीत होती. मध्येच खाणीकडे जाणारी आगगाडीची रेल लागली पण तिला उजवी घालून रघूची ट्रक त्या न संपणाऱ्या रस्त्यावरून धावत होती.

खाणीचा परिसर मागे पडला होता.

कोळशाच्या राशी, लोखंडाचा आणि दगडाचा भुसा, अंगावर राखी कपडे घातलेले कामगार, मधून मधून ऐकू येणारी ट्रॉलीची घंटा, खाणीत छोटचा रेलची पसरलेली जाळी, ऑफिसरांच्या इंग्रजीतून चालणाऱ्या गप्पा, जेवणाचा टाइम झाला म्हणजे कामगारांची उड-णारी झुंबड आणि कँटिनचं खमंग वास ओकणारं धुरकांडं. सगळं रघूच्या ट्रकने मागे टाकलं होतं.

रघूला हे खाणीचं वातावरण आव-डत असे पण त्याला आत काम करायची इच्छा कधी झाली नाही. ट्रक ड्रायव्हर म्हणून खाणीपासून दहा मैलावरल्या रेल्वे स्टेशनपर्यंत आणि स्टेशनपासून खाणीपर्यंत फेऱ्या मारणं हे रघूचं अत्यंत आवडीचं काम. त्याची ट्रक रस्त्यावरून धूळ उडवत जाई तेव्हा त्याला आपण सगळ्या जगाचे राजे असल्याचं समा-धान वाटे. मालकाचं आपल्या घोडया-वर प्रेम असतं तसं रघूचं विसाव्या शतकातल्या ह्या गाडीवर प्रेम होतं.

गाव सोडून खाणीवरची ड्रायव्हरची नोकरी धरल्याला गेल्या जेष्ठात आठ वर्षं होत आली. एवढचात बाकीच्या ट्रकचे किती ड्रायव्हर कंटाळून गेले. रघूने नवीन आलेल्या ड्रायव्हरबरोबर सख्य जोडावं. तोपर्यंत तो आपला उब-लेला असायचा.

"ह्यो कसलं जिनं! आपलं मुक्या जनावरागत खाणीवरनं हापिसराना घेयाचं ते स्टेशनपोतर नी स्टेशनवरून थेट सवारी आनायची ती खाणीवर. सिनेमा न्हाय तमाशा न्हाय. राघोजीराव ह्या असल्या नोकरीचा तुमचा तुम्हाला लखलाभ."

असं म्हणून त्याचे मित्र त्याचा निरोप घेत. आता त्यांचं म्हणणं काही खोटं नव्हतं. पण रघूचा वेळ मात्र छान जाई. सकाळी साडेसहाला तो रेडिओ-वरली भजन ऐकी. सकाळचे प्रातर्विधि होईतोवर आठ वाजत. आंघोळीसाठी लाइन लावावी लागे. ज्यांची बायका-पोरं होती त्यांना कंपनीने दोन दोन सेपरेट खोल्या दिल्या होत्या आणि रघूसारख्या कुटुंबाला गावी ठेवून आले-ल्यांना सिंगल खोलीत ५–६ जणांना राहावे लागे. ८॥ ला डयूटीवर हजर ते १२॥ पर्यंत, दुपारी जेवण. की पुन्हा अडीच नंतर दुपारच्या फेऱ्या सुरू होत. संध्याकाळी खाणीच्या तलावावर जाऊन आपल्याबरोबर ट्रकला मस्तपैकी घासून पुसून ट्रकमधल्या देवाच्या फोटोला हार घालून उदबत्ती लावून रघू ट्रक घेऊन घरी यायचा. रात्री भटाकडे जेवून विठोबाचा गजर केला की आपला मुक्त मनाने झोपायला मोकळा.

वर्षाकाठी एकदा रजा काढून पंढ-रीची वारी आणि बायकापोरात महिना-पंधरा दिवस काढले म्हणजे डोक्यावरून पाणी गेल्यासारखं त्याला वाटे. त्याच्या जीवाला जीव देणाऱ्या भाऊ भावज-यींच्या सोबतीत असलेल्या आपल्या बायकोची आणि पोरांची त्याला काळजी वाटत नव्हती.

सुटी संपत आली म्हणजे आपल्या राजलक्ष्मीला म्हणजे ट्रकला घेऊन केव्हा स्वारीवर जातो असं त्याला होऊन जाई

आज मात्र स्टेशनपर्यंतचा अर्धा अधिक रस्ता रघूने जणू काही मिटल्या डोळयांनी कापला होता. आजूबाजूच्या परिचित दृष्यांकडे आज त्याचं लक्ष अजिबात नव्हतं. रस्त्यावरले खाच-खळगे पाठ असलेल्या रघूचा हात गाडीच्या चाकावरून नकळत सुटत होता. कारण नेहमीचे खळगे टाळून गाडी चालवायला त्याचं मन होतंच कुठे इकडे.

ते थेट भवानीमामाबरोबर आजोळी तरंगत गेलं होतं.

आज रघूची राजलक्ष्मी भवानी-मामाला आणायला स्टेशनकडे निघाली होती. त्याची ड्यूटी चोख. म्हणून सायबांनी ही खास सवलत दिली होती. आज ट्रक रघू स्वतःच्या पावन्यांसाठी वापरणार होता. भवानीमामाचं 'महत्वाचं काम आहे भेटायला येतो' म्हणून रघूला पत्र आलं होतं.

लहानपणी भवानीमामाला रघूचा भारी लळा होता. भवानीमामा रघूच्या आजोळच्या गावातला मोठा आसामी. त्याला मूलबाळ नव्हतं. सारा पसारा आणि सारं वैभव खडकावरल्या पाण्यासारखं वाया जाणार होतं.

रघूला आठवलं मामाच्या वाड्यात दुधदुभत्याची रेलचेल होती. लहान्या रघूला मामाच्या पडवीसमोरचा गोठा म्हणजे कृष्णाच्या गोष्टीतलं गोकूळ वाटे. आणि नकळत रघू कृष्ण बनून कल्पनेने गोपींची छेड काढायला जाई. मामाच्या गावातल्या संगीत मास्तराकडे कृष्णासारखा पावा शिकण्याचा प्रयत्न छोट्या रघूने केला होता. अजून त्याचा गाण्याचा भजनाचा नाद सुटला नव्हता. मामीच्या हातची पुरणाची पोळी जशी मऊ मांजरीची पाठ. घरातल्या साजूक तुपाची धार वर सोडली म्हणजे मामा-मामीच्या लाडक्या रघूचा पोळी खाण्याचा सपाटा चालू होई. मग मामी लाडाने,

"रघ्या अधाशा" म्हणून पाठीत एक लाडीक चापट मारी.

तो काळ फार मागे पडला होता.

भवानीमामाला देवदेवकीचं भारी वेड लागलं होतं. भोंदू बुवा-बायांनी मामाचा पैसा लुटायला सुरुवात केली. भाऊबंदांनी मामाला समजवायचा प्रयत्न केला पण कोकीळीची अंडी उबवणाऱ्या कावळ्यासारखं त्याने कृतघ्न सर्पांना जवळ केलं. आता तो सर्वसंग परित्याग करणार असं ऐकलं होतं.

ही नोकरी धरल्यापासून रघूला भवानीमामा भेटला नव्हता. तो आज कामासाठी त्याला भेटायला येणार होता. स्टेशनवर भवानीमामा नि मामी दिसल्यावर रघूला भरून आलं. आकाशात मळभ आलं होतं. तसं त्याचं हृदय जड झालं होतं. तो दोघांच्या पाया पडला.

पूर्वीसारखं मामीचं मळवट कपाळभर होतं पण पाठ वाकली होती. मामाच्या पाठीवर बोचकं आणि हातात वळकटी होती. आईने पोराला छातीशी धरावी तशी एक जड पिशवी उराशी दाबून धरून मामी उभी होती.

मामा आल्याला दोन दिवस झाले.

रघूनं ट्रकमधून त्याला खूप फिरवलं. आजूबाजूच्या २०।२५ मैलांच्या परिसरात जे जे पहाण्यासारखं होतं ते रघूने मामाला दाखवलं होतं. मामा खूष होता. रात्रीची जेवणं-खावणं झाल्यावर उसंत मिळाली होती. इतक्या वर्षांनी रघूबरोबर काही निवांत काळ मिळाला होता.

" रघ्या तुझी राजलक्ष्मिमी म्हंजी अक्षी लक्ष्मिमी हाय पग. लख्ख ठिवलीस की त्वांड पगाया आरशाची गरज नाय."

" तर व्ह. हायिच ती माजी लाडाची. माज्या ट्रकनी खानवाल्यान्ला कधी दगा दिला न्याय. म्हून तर लक्ष्मी म्हनतो. "

" ते असू दे रे " मामा म्हणाला.

" आदी घरच्या लक्ष्मिमीला आन हितं. हे काय जिनं हाय ? सगळे बाप्ये माणसं एका खोलीत न्हातात. त्यापरीस घरच्या समद्यास्नी हितं आन. घर कर हितं. आता गावाला काय न्हायलंया ? सगळी तुझ्या राजलक्ष्मिमीमधनं फिराया जातील. घरची गाडीभी हाये. "

म्हणजे मामा समजत होता की, ट्रक रघूची आहे. रघूने त्याचा गैरसमज दूर केला. सांगितले की, एक दिवस ही ट्रक विकत घ्यायची हे त्याचे स्वप्न आहे. शिल्लक ठेवलेले पैसे आणि थोडं कर्ज काढून त्याला ट्रक विकत घ्यायची होती. मग खाणीवरची नोकरी सोडून द्यायची. गावात मालगुजाराकडची ने-आण करायची. स्वतःचा धंदा काढायचा. पण हे सगळं करायला पैसा हवा होता.

ते एक स्वप्न होतं.

त्याच्या बायकोच्या गालावरची लाली सरत आली तरी त्याचं स्वप्न, स्वप्नच राहिलं होतं. स्वप्नं अशी सुंदर असतात. रंगीत, कधी न कोमेजणारी म्हणून की काय, ती मिटल्या डोळ्यासमोर फुलतात. डोळे मिटले की, खाणीचा करडा रंग आणि सुना माळरान हे तूर्त रघूचं नशीब होतं. त्याच्या फुलणाऱ्या स्वप्नांची जिवंत खूण त्याची राजलक्ष्मी होती.

भवानीमामा आणि मामी काशीला चालले होते. पुन्हा परत येण्याचा त्यांचा विचार नव्हता. आता गंगेकाठी देह ठेवायचा असं दोघांचं निश्चित झालं होतं. म्हणून ते रघूचा निरोप घेण्यासाठी आले होते. जाताना एक वस्तू रघूकडे ठेवून जाणार होते.

" ही घागर बघ. तरुन व्हतो त्येवा पहिल्यान् काशीला गेलो व्हतो. त्यवाची ही गंगा. आता मला तिची गरज न्हाई. "

आता गंगेच्या पवित्र पाण्यात देहाची माती विरघळन जाणार होती. भवानीमामाची पुण्यसंपदा त्या घागरीत होती. ती त्याने रघूला दिली.

" इट्टलाकडे जान्याआधी सांगून ठेवीन. गुरवाकरवी तुला चिट्टी घालीन. तेव्हा या छोटयाशा घागरीतल्या पान्यानी माज्या नावानी आंगुल कर. देव तुजं भलं करील. तुजं सपन खरं ठरलं असा माजा आशीर्वाद हाय. "

मामाने गंगाजलाची घागर रघूला आपल्याजवळ ठेवण्यास सांगितले. परंतु त्याच्या खोलीवर ठेवायला मामा राजी नव्हता. ती खोली हे काय घर होतं ?

त्यापेक्षा गावातला चव्हाटा बरा. जेथे रघूशिवाय इतर कोणी वावरत नसेल तेथे घागर ठेवावी अशी मामाची इच्छा होती. खाणीच्या परिसरात अशी जागा सापडणे कठीण होते. परंतु मामाची शेवटची इच्छा पुरी व्हायला हवी होती.

रघूने आपल्या राजलक्ष्मीमध्ये सीटच्या खाली घागर ठेवायची ठरवले. रघूशिवाय कोणी त्या सीटवर बसणे शक्य नव्हते.

राजलक्ष्मी रघूची एकट्याची होती.

मालकीची नसली तरी जिवाची होती.

हातोहात मामाने स्वतः घागर सीटच्या तळाशी ठेवली. रघूने घागरीच्या खालच्या बाजूला पितळेची रिंग घातली. घागर हलू नये म्हणून घागरीच्या तळाला आणि रिंगला डाग दिला.तोंडावर सील होतं. त्याला फडकं बांधलं.

मामाचा जीव निरात झाला.

बावल्या फुलाला तरतरी आली.

मामीची वाकलेली पाठ ताठ झाली.

दोघांनी रघूचा निरोप घेतला.

पहिल्या पावसाने इवलासा अंकूर यावा आणि पुन्हा पाऊस न पडल्याने सुकून जावा तसं मामा-मामी गेल्यावर पुन्हा रघूचं आयुष्य त्याच्या ट्रकप्रमाणे ठरल्या जागेवर फेऱ्या मारीत राहिले.

वर्ष उलटले.

कंपनीने नवीन बारा ट्रक्स् मागवल्या होत्या. आता जुन्या ट्रक्स्ची अडगळ वाटत होती. शिवाय पहिल्या मोटारींवर दुरुस्तीसाठी खूप खर्च येत असे. इतरांबरोबर 'राजलक्ष्मी' मोडीत निघाली. टायर आणि इतर ज्या भागाचा उपयोग होण्यासारखा होता ते भाग काढून घेण्यात आले. खाणीच्या पश्चिमेकडच्या गेटजवळ जुन्या गंज आलेल्या लोखंडाचा मोठा ढिगारा होता. त्यांत राजलक्ष्मीचं धड जाऊन पडलं.

रघूला नवीन ट्रक चालवायला मिळाली. माणूस म्हातारं झालं तर यात्रेला जातं. आपल्या माणसापासून कधी ना कधी प्रत्येकाला दूर जावं लागतं. शेवटी सगळं संपतं. मग 'राजलक्ष्मी' तर येऊन जाऊन यंत्र, त्याचा लोभ का करावा? हळू हळू रघू 'राजलक्ष्मी'ला विसरला.

एके दिवशी त्याला पोस्टातून पत्र आलं. पत्रावर शिक्का होता 'बनारस.' रघूला काही आठवेना. सिनेमा सुरू होण्याआधी नुसता कोरा पडदा डोळ्यांना दिसतो. तशी त्याची स्मृती सफेदी लावल्यासारखी झाली. बनारसहून आपल्याला पत्र? आश्चर्याने आणि काहीशा अधिरेपणाने पत्र फोडलं. कुठल्याशा भटजीची सही होती.

"आपले मामा कै. भवानीमामा यांना देवाज्ञा झाली."

शब्द वाचून कोऱ्या पडद्यावर अनेक चित्र हालचाल करू लागली. पत्रात लिहिले होते की मामी अगोदर वारली. मामाने रघूला घागर फोडायला सांगितले होते.

"राघोजीराव व त्यांचे कुटुंबीय यांनी घागरीतील पाण्याचा विनियोग करावा. मामाच्या आज्ञेचा अवमान करू नये."


कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग
MALTEX BISCUITS
SATHE
MALTEX
BISCUITS
भरपूर
माल्ट असलेली
भारतातील एकमेव बिस्किटे
साठे
माल्टएक्स
कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग।
साठे माल्टएक्स बिस्किटें
आणतात रंग॥
साठे माल्टएक्स बिस्किटांची
आगळीच रुची।
साठे माल्टएक्स बिस्किटें
कुरकुरीत, व ताजी॥

रघूला शरमल्यासारखे झाले. आपण इतक्या लवकर, इतक्या सहज मामाला विसरलो ?

ओल्या डोळ्यांनी आणि भरल्या मनानी तो तसाच ट्रकचं जुनं धड शोधायला गेला. त्या बिनओळखीच्या ढिगाऱ्यांतही त्याला त्याची ट्रक ओळखता आली. कुदळ घेऊन रघू कामाला लागला. खाणीच्या या बाजूला चिटपाखरू नव्हते. संध्याकाळी ह्या ठिकाणचा गेट बंद होत असे. आजूबाजूला मोडक्या गंजक्या लोखंडाचा खच पडला होता. डोक्यावरून ट्रॉलीची दोरी जात होती. ती तेवढी मधून मधून थरथरत होती. बाकी सर्व चिडीचूप होते.

लांबवर वस्तीवरचे दिवे हळू हळू उजळत होते. मागल्या रानांतून रातकिड्यांनी बांग द्यायला सुरुवात केली होती. सूर्य मावळला होता. रघूच्या समोरच्या डोंगरमाथ्यावर टेकलेल्या आभाळांत लाल रंगाचा वर्ख उधळत होता.

नकळत रघू तोंडाने रामनाम जपत होता. छातीत विलक्षण धडधडत होते. त्याने घाण कचरा बाजूला सारून घागर बाहेर काढली कुदळीचं काम झालं होतं. नेटाने जोर करून घागर मोकळ्या जागेत आणली. मोटार दुरुस्तीच्याच एका कांबीने तिचं तोंड फोडलं. आत हात घातला.

हात ओला झाला नाही.

पाणी डचमळलं नाही.

आत कापडाच्या लहान लहान पुरचुंड्या होत्या. एक पुरचुंडी बाहेर काढून सोडली. आत सोन्याचा पिवळा धम्मक दागिना होता. आणखी पुरचुंडीतून आणखी दागिने निघाले. खालच्या बाजूला अस्सल चांदीचे रुपये निघाले.

स्वतःचा धंदा सुरू करायला येवढा पैसा रगड होता.

भवानीमामाचा आशिर्वाद खरा ठरला. त्याच्या राजलक्ष्मीने ही लक्ष्मी त्याच्यासाठी जपून ठेवली होती. रघूच्या सर्व जाणीवा लोप पावल्या. त्याच्या हातांतल्या सोन्याचा रंग आकाशापर्यंत पोहोचला होता. त्याने मामाच्या आत्म्याला मनोमन साष्टांग दंडवत घातला.

दिवस रात्रीच्या उंबरठ्यावर होता. रघूचा भाग्योदय उद्याच्या पहाटेबरोबर उगवणार होता.

त्या धुळीच्या ढिगाऱ्यापासून रघू दूर दूर जात होता.

● ● ●



# जबानी चौथी । शेवटची
## हप्ता चौथा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक : अशोक शहाणे

कर्नल माझ्यासमोर बसला. दोघं शिपाई मला दोन्ही बाजूंनी धरून उभे राह्यले.

अचानक धावतपळत कॅप्टन बॉब आत आला. धडपडत कर्नलला सॅल्यूट करून म्हणाला--सर !

कर्नल भयंकर संतापला.

--का म्हणून असं न विचारता-सवरता एकदम आत घुसतोस मनाला येईल तेव्हा ? साधे लष्करी एटिकेट्स ठाऊक नाहीत ?

पण कॅप्टन बॉब काही वरमल्या-सारखा दिसला नाही. अर्थात् तोंडानं म्हणाला-- सॉरी ! पण मी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आणलीय् सर !

--युद्धाची बातमी ?

--हो सर ! आत्ताच बी. बी. सी. चा ब्रॉडकास्ट ऐकून आलो !

--काय ?

--रंगूनला शत्रूच्या हेडक्वार्टर्सवर परवा रात्री जे कार्पेट-बॉंबिंग झालं,

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय

त्यात हा सुभाष बोस मेला ! आज अंत्यसंस्कार आहे रंगूनला !

—शुअर ?

—हो सर ! ऑल इंडिया रेडिओनं पण कन्फर्म केलंय् !

—हुर्रो !

ताडकन् उठून उभा राह्यला सिप्सन ! पिशाचासारख्या आनंदानं ? नाही ! नेताजींच्या मृत्यूच्या बातमीमुळं झालेल्या आनंदानं मुळीच नाही ! आपला बेत सफल झाला म्हणून ! भलत्याच आनंदानं तो उडी मारून माझ्यासमोर आला ! अन् एक प्रचंड थप्पड ठेवून दिली त्यानं माझ्या गाला-वर ! दातओठ खाऊन म्हणाला—इन्फर्मल स्पाय !

हाय नेताजी ! तुमच्यावरची बेहद्द श्रद्धा न् प्रेमच आडवं आलं माझ्या वाटेत ! ह्यांनी इतक्या पद्धतशीरपणानं सापळा टाकला असेल असं स्वप्नात-देखील आलं नसतं ! बाँबवर्षावात नेताजी मरण पावले, हे ऐकल्यावर क्षणभर मी विसरूनच गेलो की आपण बहिरे आहोत ! लक्षातच राह्यलं नाही की इंग्रजी आपल्याला अजिबात समजत नाहीय् ! लक्षात नाही राह्यल की आपण असं दचकणं काही ठीक व्हायचं नाही ! चूक, चूक, भयंकर घोडचूक करून बसलो मी एका अर्ध्या क्षणात ! मला स्वत:चाच विसर पडला होता तेवढ्यापुरता ! त्याक्षणी माझ्या चेहऱ्या-वर काय भाव उमटले होते कोण जाणे ! पण ढेरपोट्या कर्नल सिप्सनच्या हाती मी अगदी पुरता सापडून गेलो होतो !

आकाश हादरवून सोडणारं हसू हसला सी-फोर्थ हायलँडर्सचा सेनापति ! म्हणाला—बॉब, तुझ्या नाटकानं मी एवढा खूष होऊन गेलोय् की ह्याच्या बदल्यात तो विश्वासघातकी खरंच मेला असता तरी मी इतका खूष झालो नसतो बहुतेक !

मुका बहिरा बौद्ध ब्रह्मी भीक्षु वा-युंग त्या बॉबच्या कार्पेट-बाँबींगमध्ये मरूनच गेलाय्, तेव्हा आता ह्या सरदार हरगोविंदसिंगला बोलायला काहीच हरकत राह्यली नव्हती. तर मी बोललो.

मी म्हणालो—नाही ! नेताजी विश्वासघातकी नाहीत ! तमाम जिंदगीभरच ते म्हणत आलेयत, ब्रिटन आमचा एक नंबरचा शत्रू आहे म्हणून !

कर्नल सिप्सन चमकला ! त्याच्या हातातला रूळ प्रचंड वेगानं माझ्या

चेहऱ्यावर आदळला. नाकातनं भळा-भळा रक्त वाह्यला लागलं माझ्या. अंगावरचं पिवळं उत्तरीय रक्तानं लाल होऊन गेलं माझे दोन्ही हात मागं बांधलेले होते, त्यामुळं नाक पुसता येईना. हनुवटी न् छाती लालेलाल होऊन गेली.

कर्नल सिप्सन किंचाळला—मी शंभरदा म्हणीन—सुभाष बोस इज ए ट्रेटर ! विश्वासघातकी !

माझ्या रक्ताळलेल्या चेहऱ्यावरलं हसू नक्कीच बीभत्स दिसत असेल. मी हसतच म्हणालो— साहेबा, ते तू म्हणणारच की ! तुम्ही भारतात आला होतात व्यापार करायच्या सबबीवर न् करतांय् मात्र चक्क राज्य ! विश्वास-घाताबद्दल तुम्ही मंडळी म्हंजे अगदी ऑथॅरिटीच आहात की !

कर्नलचा रूळ दुसऱ्यांदा जोरात खाली आला — एवढंच मला आठवतंय् ! ह्या खेपेला माझ्या मुंडन केलेल्या डोक्यावर ! नंतरच्या एकसारख्या फटक्यांनी कधी माझी शुद्ध गेली तेच मला कळलं नाही !

परत शुद्धीवर आलो तेव्हा कळलं, की आपले हात अजुनी मागं बांधलेलेच आहेत. एवढ्यांत तर पायपण बांधून टाकलेय्त. पक्क्या दोरानं. मी दगडावर पडून होतो. जमिनीवर. वर एक झाड. त्याच्या सावलीत. सूर्य कलला होता. सबंध अंगात कळा मारत होत्या. असह्य !

मी डोळे उघडलेय्त असं बघून एक धिप्पाड जवान माझ्याकडे आला.

का कोणजाणे, पण त्याचा चेहरा मला ओळखीचा वाटला ! कुठं बरं पाह्यलं होतं ह्याला ?

वाकून माझ्या कानाशी तोंड आणून तो म्हणाला — दोस्त !

अर्धवट बेशुद्धींत, अर्धवट शुद्धींत पहिल्यांदा लक्षातच येईना माझ्या. हे आपण आहोत तरी कुठं ?

—माझी ओळख पटत नाही ना हरगोविंदभाई ?

हा ! आत्ता ओळखलं ! अन्वरभाई !

पण हा इथं कसा आला ?

प्रचंड आश्चर्यानं मी म्हणालो — अन्वर ?

—हां दोस्त ! पण ही तुझी काय हालत झाल्याय् ? धर्म सोडलास तू ?

— माझं नतर ! पण तू इथं कसा-काय आलास ?

—मी ह्या डिटॅचमेंटचा सेकंड लेफ्ट-नंट आहे. जीव बचावून सरतेशेवटी येता आलं पळून !

काय आश्चर्य आहे ! मी उठायला जात होतो. अन्वरनं अडवलं. म्हणाला —काय पहातोस ? आणखीकुणी नाही ना ? नाही ! आणखी कुण्णी नाही ! आणखीकुणी असतं तर तुझ्याशी असं बोलता आलं असतं ? आत्ता मी एकटाच आहे. तुझ्यावर पहारा देतोय् !

ताबडतोब मला सगळं काही आठवलं.

लगेच म्हणालो —अन्वरभाई, एक उपकार करणार माझ्यावर ?

—जान कबूल ! हुकूम फर्माइये !

—वचन दे करीन म्हणून !

—तुझा काय ह्या अन्वरभाईवर विश्वास बसत नाहीय् दोस्त ?

मी एक सेकंद विचार केला. नाही, आणखी काही मार्गच नाही. जमलं तर अन्वरच्याच हातनं होईल कदाचित्.

—मी तुला एक काम करायला सांगणाराय्. तुला काही कठीण नाही ते करणं. फक्त कारण वगैरे विचारायचं नाहीस तू !

—पण काय काम ते तर आधी सांग.

—आंग्रेशू टेकडीवर एक मोडका फुंगी चंग म्हंजे पॅगोडा आहे. पाह्यलायस ?

—हो पाह्यलाय् ! तिथं आमचं एक प्लॅटून आहे.

—ह्या टेकडीच्या माथ्यावर एक प्रचंड शिळा आहे रस्त्यावर लोंबती. त्या शिळेवर लाकडं रचून एक चिता रचून ठेवलेली आहे. पाहृयल्यायस ?

—हो पाहृयल्याय् ! कसली तरी निशाणी असेल.

—बरोबर ! तर आज रात्री काहीही करून ती चिता पेटवून द्यायला हवी !

—पण आजच रात्री तुझी पळून जायची व्यवस्था केली नाही. तर—

—नाही अन्वरभाई ! मी पळून जायची घांदल तू करू नकोस. बोल, ऐकशील एवढं ?

एकदम धमकावून उठला अन्वर !

म्हणाला—बकबक मत करो, जपान का कुत्ता !

मी दचकलोच ! हाच का आपला दोस्त अन्वर ?

दुसऱ्याचक्षणी शंका फिटली. दोघं सैनिक माझ्याकडे येताना दिसले. मला शुद्धीवर येऊन किती वेळ झाला म्हणून त्यांनी अन्वरला विचारलं.

अन्वर म्हणाला—हे आत्ताच !

—तर मग ह्याला आताच्या आता घेऊन जायला पाह्यजे. शुद्धीवर आल्याबरोबर त्याला माझ्याकडे आणा, असं कर्नलसाहेब म्हणाले होते.

अन्वर म्हणाला—जा, घेऊन जा ! हा जपानी कुत्ता माझ्या नजरेआड न्या !

—नाही. तुलापण बरोबर यायला लागेल. ही तुझीच तर जिम्मेदारी आहे.

शेवटी ते तिघंही मला घेऊन निघाले. चालायइतकी ताकद नव्हती माझ्यात. पण चालवतच नेलं त्यांनी मला. कर्नल सिप्सनच्या समोरच्या एका रिकाम्या खुर्चीवर त्यांनी मला बसवलं.

—आता जा तुम्ही ! नाही नाही, लेफ्टनंट अन्वर हुसेन, तू तेवढा थांब !

बाकीचे दोघं सॅल्यूट ठोकून निघून गेले.

मग कर्नलनं अन्वरला विचारलं—ह्याचं नावगाव सगळं विचारून घेतलंस का ?

—हा उलटंसुलटं बोलतोय् सर ! तुम्हीच विचारा.

कर्नलनं तिखट नजरेनं एकदा माझ्याकडे पाह्यलं. मग अन्वरला माझे हातपाय मोकळे करायला सांगितलं. दोऱ्या सुटल्यावर मला जरा बरं वाटलं. माझा हात आपोआपच डोक्यावर गेला—तिथं एक बँडेज होतं.

—काय नाव काय तुझं ?

—रामावतार शर्मा !

—तू हिंदु आहेस ?

—हो.

—तू स्पाय आहेस ?

—नाही ! मी आझाद हिंद सेनेतला सैनिक आहे. गांधी ब्रिगेडमधला. सेकंड लेफ्टनंट आहे मी.

—मग लष्करी गणवेश न घालता असं वेशांतर करून इथं शत्रूच्या छावणीत कशाला आलाय्स तू ?

मला काही उत्तर देता आलं नाही.

—हे पहा शर्मा. तू काही युद्धबंदी नाहीस ! तेव्हा तुझ्याबरोबर चांगलंच वागलं पाहिजे अशी काहीच जबाबदारी माझ्यावर नाही ! आता तू सेकंड लेफ्टनंट आहेसच तर तुला इतकं तरी माहित असेलच. आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणं हेरांना चांगली वागणूक द्यायची माझ्यावर काहीच सक्ती नाही ! गोष्टी सरळ सांगितलेल्या मला आवडतात ! तेव्हा मी आपलं तुला स्पष्टच सांगून टाकतो—तुला मृत्युदंड देण्याशिवाय दुसरा काहीच मार्ग माझ्यासमोर मोकळा नाही ! अन् भीक मागून काही उपयोग नाही हे आधीच सांगून ठेवतोय् ! कळलं ?

—कळलं !

—पण मनात आलं तर एक करता येईल मला ! तुला भेट म्हणून सैनिकाचं मरण मी देऊ शकेन ! फायरिंग स्क्वाडसमोर उभं राह्यचा मान मी तुला देऊ शकेन ! तसं तर मनात आलं तर मी तुला एखाद्या स्पायसारखं जिवंत जाळूही शकेन ! आलं लक्षात ?

—आलं

—तर तुला मी सैनिकाच्या सन्मान्य मरणाची भेट द्यायला तयार आहे ! पण एक अट आहे ! मी विचारलेल्या प्रश्नांना तू खरीखरी उत्तरं दे ! देशील ?

एक क्षणभर विचार करून घेतला मी. म्हणालो—ठीक आहे ! मी खरं तेच सांगीन ! पण तुम्हाला पण एक शब्द द्यावा लागेल ! माझी अंत्यक्रिया तुम्हाला माझ्या इच्छेप्रमाणं करावी लागेल !

कर्नलनं पण क्षणभर विचार केला.

मग तो म्हणाला—अगदीच अशक्य कोटीतलं असं काही तू मागून बसणार नाहीस अशी मला आशा आहे. म्हंजे तुझं प्रेत तुझ्या सैन्यातल्या लोकांच्या हाती सोपवायची गोष्ट काही तू काढू नकोस !

—नाही ! तसं काही मी मागत नाही ! मी फक्त हिंदूंच्या रीतीप्रमाणं इथंच अंत्यसंस्कार व्हावेत एवढंच मागतोय् !

—ठीक आहे ! मी तयार आहे ! पण तुला तशी शपथ घ्यावी लागेल ! तुझ्या धर्मग्रंथावर हात ठेवून तुला शपथ घ्यावी लागेल की आपण खरं बोलू म्हणून !

—त्याला पण माझी तयारी आहे कर्नल ! त्याच्या बदल्यात तुम्हाला पण बायबलवर हात ठेवून शपथ घ्यावी लागेल की माझ्या इच्छेप्रमाणं तुम्ही माझा अंत्यसंस्कार कराल !

कर्नल सिप्सन ताड्दिशी खुर्चीवरनं उठला !

म्हणाला—तू हे कुणासमोर बोलतो-य्स हे ठाऊक आहे ना तुला ?

मी म्हणालो—ठाऊक नसायचं काहीच कारण नाही साहेब ? मी बोल-तोय् मला मृत्यूची सजा देणाऱ्या माणसासमोर! पण माझी सूचना बिलकुल रास्त आहे! शपथ घ्यायची तर आपण दोघांनीही घेऊ या, नाहीतर मग कुणीच शपथ घ्यायला नको!

कर्नल सिप्सननं चार येरझारा घातल्या. परत आपल्या जागेवर येऊन मग अन्वरला म्हणाला—कुणातरी हिंदू शिपायाला त्यांचं ते पुस्तक घेऊन यायला सांग!

—अन् त्याचबरोबर एक बायबल-पण!

मी पुस्ती जोडली.

जळजळीत नजरेनं माझ्याकडे बघत सिप्सननं खाड्दिशी टेबलाचा ड्रावर बाहेर काढला. एक जाडजूड पुस्तक बाहेर काढून टेबलावर ठेवल.

दोनचार मिन्टातच अन्वर परत आला, मागोमाग एक हिंदू हवालदार. त्याच्या हातात काहीतरी एक ग्रंथ. हिंदूंचा धर्मग्रंथ रामायण असतो असं मी ऐकलं होतं. पण तो तर आकारानं भलताच मोठ्ठा असतो. हवालदारानं आणलेला ग्रंथ अगदीच छोटा होता. खिशात मावण्याजोगा. कसला ग्रंथ होता एक गुरुजीच जाणेत! 'मीरा' का 'गीता'—काहीतरी बायकी नाव होतं ह्या ग्रंथाचं.

आम्ही दोघांनीही शपथ घेतली.

मग अन्वरकडे वळून कर्नल सिप्सन म्हणाला—आता तू बाहेर जा!

अन्वर सॅल्यूट करून निघून गेला.

मग कर्नल सिप्सन एकएक प्रश्न विचारत गेला. खानजोलला किती सैनिक आहेत? कमांडिंग ऑफिसर कोण आहे? शस्त्रास्त्रं कायकाय आहेत? भारी तोफा आहेत का नाही?

उत्तरं मी बहुतेक खरीच दिली. कारण मला माहीत होतं की ह्या सगळ्या गोष्टी बहुतेक ह्याला आधी पास्नं ठाऊकच असतील. फक्त मी खरं बोलतोय् का नाही हे बघण्याकरताच तो विचारत असणार. शस्त्रास्त्रं काय-काय आहेत ते मी 'माहीत नाही' म्हणालो. कारण ते मला खरंच माहीत नव्हतं.

—तर तुझं म्हणणं की तीनशेपैकी फक्त पन्नासजणच तेवढे आता उरलेयृत. म्हंजे आम्ही हल्ला चढवला तर ते आम्हाला थोपवायला बघतील का पळून जायला बघतील ?

मी म्हणालो—कर्नल, मी शपथ घेऊन बोलतोय्! पुढं कोण काय करेल ते मला शपथेवर सांगता यायचं नाही!

एवढ्या वेळात पहिल्यांदाच कर्नल सिप्सन हसला. म्हणाला—तू स्पाय न होता खरंतर वकीलच व्हायला हवा होतास ?

मग त्यानं विचारलं—तू आंग्रेशूकडे कशाकरता चालला होतास ?

न डगमगता मी म्हणालो—टेकडी-वर चढून शत्रूच्या सैन्याच्या हालचाली बघण्याकरता!

—म्हंजे तू स्पाय झालास!

—पण प्रोफेशनल नाही! तरी मला ह्याच कामगिरीवर पाठवलं होतं हे मात्र खरं!

आणखी बरेच प्रश्न विचारून त्यानं आमच्याकडली सगळी माहिती काढून घेतली.

शेवटी अन्वरला बोलवून म्हणाले—ह्याला घेऊ जा!

अन्वर पुढं झाला. न् त्यानं माझा दंड पकडला.

मी म्हणालो—कर्नल, पण माझा अंत्यसंस्कार कसा व्हावा ते मी अजूनी काहीच सांगितलेलं नाही!

कर्नल सिप्सन दुसऱ्यांदा हसला. पण ह्यावेळी मजेनं नाही. कर्नल सैतानाचं हसू हसला.

म्हणाला—तू फार धूर्त आहेस! पण धूर्तपणात मला हरवणं काही इतकं सोपं नाही शर्मा! तुझ्याजवळ जी काही गुप्त माहिती होती ती तू सांगून टाकल्याय्स? आता मी तुझी विनंती धुडकावून लावली तर?

असं काही तो म्हणेल अशी शंका मला पहिल्यापास्नं होती. त्याच्यामुळे माझं उत्तरपण तयार होतं—तर मग तुझा आत्मा अनंतकाळपर्यंत सैतानाचा गुलाम होऊन राहील! तू बायबलवर हात ठेवून—

तबू उडून जाईल इतक्या मोठ्यांदा हसला कर्नल सिप्सन!

ते जाडजूड पुस्तक माझ्या नाकासमोर उघडून धरून म्हणाला—ही आहे इंग्लिश-उर्दू डिक्शनरी!

गप्पच बसावं लागलं मला.

हसून झाल्यावर मग कर्नलनं विचारलं—आणखी काही बोलायचंय्?

—हो! दोन गोष्टी बोलायच्यायत! एक म्हंजे—ज्या गोष्टीवरनं मघाशी तू मारहाण केलीस मला, ती गोष्ट आत्ता मान्य करतोय्स तू!

कर्नल सिप्सनच्या भिवया वर गेल्या.

तो म्हणाला—सॉरी! माझ्या लक्षात नाही. कशावरनं मारलं होतं मी तुला?

—मी म्हणालो होतो, तुम्ही भारतात आला होतात व्यापार करायला, अन् करताहात राज्य! तेव्हा विश्वासघाताबद्दल इंग्रज जात म्हंजे ऑथॅरीटीच मानायला पाह्यजे!

कर्नल सिप्सनचा चेहरा लालीलाल होऊन गेला! त्याच्या तोंडून उत्तर बाहेर पडेना!

मी त्याच दमात पुढं म्हणालो—दुसरी गोष्ट! ही शपथ तू एका साक्षीदारासमोर घेतली होतीस! ह्या लेफ्टनंट अन्वरसमोर! ह्याच्या ब्रिगेडच्या कर्नलला आता आयुष्यभर ह्याच्या नजरेला नजर भिडवता यायची नाही! तोंडानं हा न म्हणू दे, पण मनातल्यामनात हा म्हणत राहील—आपला कर्नल विश्वासघातकी आहे म्हणून!

असह्य संतापानं कर्नल सिप्सन तंबू सोडून बाहेर निघून गेला! मी तसाच बसून राहृचलो! अन्वर पण तसाच ताठ उभा होता!

पाचेक मिनटांनी सिप्सन परत आत आला. स्वतःच्या खुर्चीवर जाऊन बसला. जणू पाच मिनटापूर्वी काहीच

घडलेलं नव्हतं !

म्हणाला—आज संध्याकाळी तुला फायरिंग स्क्वाडसमोर उभं करण्यात येईल ! आता बोल तुझ्या प्रेताची विल्हेवाट कशीकाय लावायची ?

—आंग्रेशू टेकडीच्या माथ्यावर जो पार्विंग स्टोन आहे त्याच्यावर एक चिता रचून ठेवलेली आहे. आज रात्री आठच्या सुमाराला कुठल्यातरी चांगल्या ब्राह्मणाच्या हातनं माझ्या प्रेताला अग्नि द्या.

अन्वरनं तिरप्या नजरेनं एकदा माझ्याकडे बघितलं. त्याच्या चेहऱ्यावरचा भाव काही बदलला नव्हता. पण कर्नल सिप्सन चक्क चाट पडला होता. काहीच न बोलता टेबलाच्या ड्रावरमधनं एक दुर्बीण काढून तो तंबूच्या बाहेर निघून गेला.

थोड्या वेळानं परत येऊन म्हणाला—ह्या अफलातून इच्छेचा अर्थ काय ? अन् तिथं अशी लाकडांची चिता तरी काय म्हणून रचून ठेवल्याय् ?

मी खंबीर आवाजात म्हणालो—कर्नल, आमच्या सैन्याबद्दल तुम्ही इतके प्रश्न विचारलेत पण मी काही एकदाही तुम्हांला विचारलं नाही, असे अफलातून प्रश्न का विचारताय् असं !

—हो ! ते खरं आहे !

त्याला कबूल करावंच लागलं.

—पण कारण सांगायलाही माझी काही हरकत नाही ! एक म्हंजे हिंदु शास्त्राप्रमाणं प्रेत जाळायचाच रिवाज आहे ! दुसरं म्हंजे रात्रीचे आठ वाजता एक मुहूर्त आहे ! अन् तिसरं म्हंजे ह्या चितेवर माझ्या प्रेताला अग्नि दिला तर माझा आत्मा तृप्त होईल !

—पण तेच तर मला कळत नाहीय्! तिथं अशी चिता कशाला रचून ठेवल्याय् !

—आमचे कमांडंट म्हणाले होते की सी-फोर्थ हायलँडर्सशी लढताना जो सगळ्यात जास्ती शौर्य गाजवून शहीद होईल, त्याला ह्या चितेवर अग्नि दिला जाईल ! अर्थात् तेव्हा ही टेकडी आमच्या ताब्यात होती ! आज काही ती आमच्या ताब्यात नाही ! तरी तिथं जर माझ्या प्रेताला अग्नि दिलात, तर खानजोलपास्नं छामोलपर्यंत जिथं म्हणून जितके आझाद हिंद सेनेचे सैनिक असतील, त्या सगळ्यांना एकच उत्सुकता लागून राहील — कोण शहीद झालं ! म्हंजे मी मेल्यावरपण सगळ्यांना माझी आठवण राहील !

—आय सी !

कर्नल सिप्सननं अन्वरला इषारा केला. त्यानं अन्वरला सांगितलं—ह्याला फायर करायची ऑर्डर मी आता दहा मिनटात पाठवून देतो. स्पाय असला तरी निर्भय आहे हा ! तेव्हा त्याला सैनिकाचं मरण भेट करायचं ठरवलंय् मी. अंत्यसंस्कारपण ह्याच्या इच्छेप्रमाणंच होईल.

परत माझे हात बांधले गेले. अन्वर न् मी तंबूतनं बाहेर आलो.

तंबूच्याबाहेर आल्याआल्या अन्वर माझ्या कानात म्हणाला— तुझा बंदुकीचा नेम कसा काय आहे ?

मी आश्चर्यानं विचारलं—का बरं ?

—संधी साधून माझी रायफल तुझ्या हातात दिली, तर माझ्या पायावर गोळी मारून तुला पळून जाता येईल का नाही? म्हंजे मी जखमीच तेवढा होईन, अन् जीव मात्र जाणार नाही!

माझ्या मनात तेव्हा स्फूर्तीला उधाण आलेलं! म्हणालो—हॅट! इथं कुणाला पळून जायचंय्? वाह गुरुजी की फतेह! माझी लढाई फत्त झाली अन्वरभाई!

अन्वर चालता-चालता थांबला.

म्हणाला—थांब! काय प्रकार तरी काय आहे ते सांग बरं मला! पळून जायला तू एवढा निरुत्साही काय म्हणून?

—अरे पण मीच पळून गेलो तर माझी चिता कशी काय पेटेल!

अन्वर जरा गप्प झाला. कसलातरी विचार करायला लागला तो. आम्ही परत चालायला लागलो.

थोड्या वेळानं हलक्या आवाजात अन्वर म्हणाला—पण मला काहीच कळत नाहीय् दोस्त! तू स्वतःचा धर्म सोडून हिंदु तरी काय म्हणून झालास? एवढा मोठा धंदा सोडून ही हेरगिरी करायला तरी काय म्हणून आलास? अन् सगळ्यात कहर म्हंजे इथनं पळून जायच्याऐवजी चितेवर चढण्याची एवढी फिकीर तुला काय म्हणून तो?

मी म्हणालो—तुला सगळ्या गोष्टी खुलासेवार सांगतो. संध्याकाळ व्हायला अजून तीन-चार तास आहेत. तुला दुसरी काही ड्यूटी आहे?

—नाही! तुझ्यावर पहारा देणं एवढंच माझं काम!

—तर मग सगळ्याच गोष्टी तुला निवांतपणानं सांगता येतील.

सगळ्या गोष्टी मोकळेपणानंच सांगून




टाकल्या अन्वरला. नेताजी पूर्व-आशियांत आल्यापास्नं जे जे झालं होतं ते सगळं सांगून टाकलं. सगळं फुंकून टाकून मी फकीर कसा झालो, ती गोष्ट ! सुभद्रा जयस्वालची गोष्ट ! काल रात्रीची डोक्याच्याऐवजी वेणी द्यायची गोष्ट ! आश्चर्यचकित होत होत अन्वरनं सगळं काही मोठ्या धीरानं ऐकून घेतलं.

शेवटी म्हणाला—आश्चर्य आहे ! आम्हाला सगळ्यांना सांगितलं होतं, आझाद हिंद सेना जपानी हुकमानं चालते म्हणून ! तुमचे बोससाहेब म्हंजे जपानच्या हातातलं बाहुलं आहे म्हणून !

—सगळं खोटं आहे अन्वर !

—आता तर तसंच वाटतंय् ! नाहीं-तर तुझ्यासारखा अमीर आदमी नंगा फकीर झाला तो कशाच्या ओढीनं ? तुझ्यासारखा धर्मनिष्ठ शीख—

थोडावेळ आम्ही दोघंही गप्प बसून राह्यलो. अन्वर गंभीरपणानं कसलातरी विचार करत होता.

एकदम तो उठून उभा राह्यला.

म्हणाला—कोई बात नही ! तुझ्या सगळ्या गोष्टी तू मला सांगितल्या-य्स ! आता माझी गोष्ट अगदी थोडक्यात सांगतो, ती ऐक—तुमने मुझको जान दिया था, मैं भी तुमको मरने नही दूंगा !

अन् अन्वर जायला लागला. मी त्याला अडवलं.

म्हणालो — तुला काय वेडबीड लागलं काय अन्वरभाई ? आता कसला मला वाचवतोय्स तू ! ते अगदी अशक्य आहे !

अन्वर मागं फिरला.

म्हणाला — त्यावेळीपण तू असंच म्हणाला होतास ! मलायाच्या युद्ध-बंद्यांच्या छावणीतनं पळून जायची गोष्ट मी काढली होती तेव्हा !

— पण ही चिता ?

—ती पण पेटेल आज रात्री !

—कशी ?

अन्वरनं हातातल्या घड्याळाकडे बघितलं.

गोड हसून म्हणाला—फिकिर मत करो दोस्त ! फिर मिलेंगे हम दोनो !

अन्वरनं आपल्या दोघां सोबत्यांना बोलावलं. तो म्हणाला—ह्या जपानी कुत्त्यावर पहारा द्या ! मी जरा जाऊन येतो !

अन्वर निघून गेला. ते माझ्या पिंजऱ्याच्या दोन्ही बाजूंना बसून राह्यले. हातात रायफल घेऊन मला हात बांधून एका लाकडी पिंजऱ्यांत टाकलं होतं. मोठमोठाले बांबू जमिनीत रोवून हा पिंजरा बनवला होता त्यांनी. वाघाच्या पिंजऱ्यासारखा.

आत्ता कुठं मला माझं मरण आठ-वलं ! अन्वर होता तोपर्यंत ही गोष्ट मनातच आली नाही एकदासुद्धा. पण येणाऱ्या मरणाच्या अगदी तोंडाशी येऊन ठेपल्यावर आत्ता मला एकदम वाटायला लागलं — आयुष्यावर किती प्रेम आहे आपलं ! पिताजी आठवले ! अम्माजीचा चेहरा आठवला ! आणखी एका मुलीची आठवण झाली. ही मुलगी

एक दिवस चिडून मला म्हणाली होती— तू रानटी आहेस, तू जनावर आहेस! पिताजी न् अम्माजी आहेत हजारो मैल अंतरावर पण ही मात्र निव्वळ पाच मैलांवर आहे. तिला कदाचित कधीच कळायचं नाही की मी इथं फायरिंग स्क्वाडसमोर आज कोसळणाराय्, ते तिचाच जीव बचावण्याकरता. तिच्याकरता न् माझ्या इतर खालसा भाईबंदांच्याकरता. त्यांचा जीव बचावण्याकरता.

आज ह्या क्षणी वाटतंय्— मरायचं नाहीय् आपल्याला! वाटतंय्—जगणं किती सुंदर आहे! ह्या जमिनीचीपण किती ओढ आहे!

कदाचित् इतक्या गोष्टी माझ्या डोक्यात आल्या नसत्या. आनंदानंच मी मृत्यूची सजा कबूल केली होती. बेडरपणानं. तृप्तीचा निःश्वास पडला होता ऐकल्यावर — की माझ्या देहाबरोबरच ही चिता आपल्या अग्निमंत्रान त्यांना मुक्तीची वाट दाखवेल!

ही जगायची इच्छा मनात अगदी अचानकच जागी झाली होती. ह्या वेड्या अन्वरच्या शेवटच्या बोलण्यामुळं. प्रवाहाबरोबर वहात जाणारा माणूस असाच काडी पकडत असेल बहुतेक.

संध्याकाळ व्हायला अजून दोन तास अवकाश होता. मरण जर ओढवणारच असेल तर आयुष्यातली शेवटची प्रार्थना करून घ्यावी हे बर. पाच 'क'चा त्याग करून आधीच सगळ्यात मोठ्ठं पाप केलंय्! अमृतसरच्या रामदास कुंडात बुडी मारून काही ते पाप धुऊन निघणार नाही. तर काय करावं? ग्रंथसाहेबातलं काही म्हणावं!

म्हटलं! अन् जीव भांड्यात पडला.

म्हणून झाल्यावर मी डोळे उघडले, तर दोघेही पहारेकरी माझ्याकडे डोळे विस्फारून बघत होते. माझा मंत्रोच्चार त्यांनी ऐकला होता. ते दोघंही शीख होते.

त्यांच्यातला एकजण माझ्याकडे आला अन् म्हणाला--तू तर हिंदु आहेस! गुरु नानकजींचा प्रार्थना-मंत्र कसा ठाऊक झाला तुला?

मी हसलो! पण उत्तर दिलं नाही काहीच!

आता फौजी गाणी गावीत. ईश्वराचं स्मरण करून झालं. आता मातृभूमीला वंदन करावं. सरळ अटेन्शनमधे उभा राहिलो ताठ. अन् म्हणायला सुरूवात केली--

शुभ सुख चैन की बरखा बरसे
भारत भाग है जागा---

पण हे गाणं संपवता आलं नाही मला! नजर त्या दोन पहारेकऱ्यांच्यावर पडली. ते बसल्या बसल्या गप्पा मारत होते.

मी कठोर आवाजात त्यांना म्हणालो, 'शरम नाही वाटत तुम्हाला? ब्रिटिशांची गुलामी करता म्हणून काय भारताच्या मुक्तिगीताचा मान ठेवायची पण अक्कल नाही तुम्हाला? तुम्ही काय जनावरं आहात का कोण रे?'

ते दोघंही सैनिक दचकले. बावळटासारखे माझ्याकडे बघत राहिले.

एकजण म्हणाला—हे तर आझाद

हिंद फौजेचं गाणं—

मी काही सूर बदलला नाही.

म्हणालो—कबूल ! हिंदुस्थानची आझादी नकोय् तुम्हाला. ब्रिटिशांची गुलामी करण्यासाठीच जन्माला आलायत तुम्ही ! पण हे गाणं म्हंजे तुमच्यापण मातृभूमीला वंदन आहे ! मला आणखी काही मागायचं नाही, पण मरणाच्या वाटेवर चालणाऱ्या एका माणसाचं म्हणणं—

ते एकमेकाकडे बघायला लागले.

मी परत सुरवात केली—

शुभ सुख चैन की बरखा बरसे

भारत भाग है जागा—

ह्या खेपेला ते दोघंही उठून उभे राह्यले.

गाणं म्हणून झाल्यावर त्यातला एक-जण म्हणाला—हे गाणं कुणी लिहिलंय् हो ?

मी म्हणालो—कुणी लिहिलंय् मला माहित नाही. असेल माझ्यासारखाच कुणी दुर्दैवी सैनिक ! आझादीचं स्वप्न पहाणारा !

दुसरा म्हणाला—गाणं फार गोड आहे. बरंचसं 'जनगणमनअधिनायक' सारखं !

मी म्हणालो—हो, त्याच चालीवर म्हणतात.

त्या दोघांच्यापैकी वयानं लहान असलेला सैनिक इकडंतिकडं बघून घेऊन म्हणाला—तू हे गाणं मला सांगतोस ? मी लिहून घेतलं असतं—

—अलबत् ! घे लिहून ! वाटलं तर 'कदम कदम बढाये जा' पण लिहून घे !

छोकऱ्याला बहुतेक गाण्यांची आवड होती. गुपचुप त्यानं गाणी वहीत लिहून घेतली.

मी म्हणालो—गाणी तर लिहून घेतलीस, आता माझी मजुरी काय देतोस ?

ते घाबरले ! मजुरी ! कसली मजुरी !

—आणखी काही नाही ! गाणं मी परत एकदा म्हणतो ! तुम्ही दोघंही माझ्याबरोबर गाणं म्हणा.

ते दोघंही परत एकदा घाबरले. म्हणाले—नाही नाही, कुणी ऐकेल !

मी हसून म्हणालो—खालसा शिखाचे बच्चे तुम्ही न् इतके डरपोक ?

मग त्यांच्यातला वयस्क शिपाई पुढं आला. आझाद हिंद सेनेबद्दल, नेताजींच्याबद्दल नाना प्रश्न विचारायला लागला. मला हेच हवं होतं. माझ्या मनात एकदम उत्साहाचं वारं भरलं. मोठ्या आनंदानं मी त्यांना सगळं सांगायला लागलो. ते सगळं ऐकत गेले. मधनंमधनं प्रश्न पण विचारले त्यांनी. आमच्या गोष्टी समजून घ्यायची त्यांना किती उत्सुकता लागलेली होती, हे माझ्या लक्षात आलं. आमच्याबद्दल, आमच्या हेतूबद्दल न् कामगिरीबद्दल त्यांची किती चुकीची समजूत होती, हे पण लक्षात आलं.

शेवटी म्हणाले—सगळं समजलं आता. पण गुरू नानकजींचा दोहा तू कसा काय म्हणालास ? तू तर काही शीख नाहीस !

मी म्हणालो—मी एक शीख नाही,

पण तुम्ही तर शीख आहात ना? मग असं अडाण्यासारखं का बोलता? सद्‌गुरू नानकजींनी काय आपला संदेश शिखांकरताच दिला होता? हिंदु-मुसलमान-ख्रिश्चन लोकांना त्याचा काहीच उपयोग नाही? गुरु नानकजींचा संदेश काय पुऱ्या इन्सानियतकरता नाहीच का?

तासाभरानं अन्वर परतला. त्याला येताना बघून हे दोघं चटकन् उठून उभे राह्यले. मग लांब जाऊन बसले.

अन्वरनं त्यांना हाक मारली—जीवनसिंग, फत्तेसिंग, तुमचा त्रास बराच कमी करून टाकलाय् मी. इथं फायरिंग स्क्वाडला बोलवायचं नाही. म्हंजे ह्या डोंगराएवढ्या जपानी कुत्र्याचा मुडदा तुम्हाला डोक्यावर घेऊन आंग्रेशू टेकडीच्या माथ्यावर घेऊन जायला नको. ह्या सैतानाला आपण चालतच आंग्रेशू टेकडीवर घेऊन जाणार आहोत. तिथं त्याला गोळी घालून मारून टाकू अन् तिथंच जाळून टाकू. कर्नलकडनं मी ऑर्डर आणल्याय् तशी.

फत्तेसिंग म्हणाला—पण एकसारखं त्याला जपानी कुत्ता, जपानी कुत्ता असं कशाला म्हणताय्? तो आझाद हिंद सेनेतला आहे, जपान्यांच्यापैकी नाही!

अन्वरला जरा आश्चर्यच वाटलं.

मी म्हणालो—लेफ्टनंटसाब, तुमच्या ह्या जीवनसिंगनं आमचं फौजी गाणं पण लिहून घेतलंय्! पहा सर्च करून! त्याच्या नोटबुकात आहे!

जीवनसिंग थोडासा घाबरलाच. पण अन्वर काही चिडला नाही. त्याला फक्त कुतूहल होतं. म्हणून त्याला जीवनसिंगची वही बघायची होती. ती संधी साधून फत्तेसिंग म्हणाला—हा इसम काही वाईट नाही पण!

अन्वर त्या दोघांना बरोबर घेऊन जरा लांब गेला. तिघांची काहीतरी सल्लामसलत झाली. शेवटी तिघंही परत माझ्याजवळ आले.

अन्वर म्हणाला—ह्या दोघांची काही भीती नाही आता! पळून जाताना आज ते पण आपल्याबरोबर असतील!

मी म्हणालो—पळून! म्हंजे?

—काही इलाजच नाही! आमच्या तिघांच्यावरच तर तुझी ही जिम्मेदारी आहे!

त्यांच्याकडे बघून मी म्हणालो—मग काय जीवनभाई? काय फतेभाई? काय ठरवलंत?

जीवनसिंग म्हणाला — पन्नास शिखांचा जान बाचवण्याकरता तू वेणीचं विसर्जन केलंस, अन् शिखाचे बच्चे असून आम्हाला एवढं पण जमायचं नाही?

फतेसिंग म्हणला — आम्ही काही जनावरं नाही! शिखाचे बच्चे आहोत आम्ही!

आनंदानं मी म्हणालो—वाह गुरुजी का खालसा!

—वाह गुरुजी की फते!

त्यांनी पुस्ती जोडली.

हाच लेफ्टनंट अन्वर हुसेन आज पाकिस्तानच्या पॅटन टँक्सच्या तुकडीचा ब्रिगेडियर झाला होता. रात्र उलटली की त्याच्याच समोर उभं रहावं लाग-

णार होतं मला. हिंदुस्थान-पाकिस्तानच्या सरहद्दीवर. कैद्यांच्या अदलाबदलीच्या रंगमंचावर. नुस्ती कल्पना करायची तरीदेखील आश्चर्यानं थक्क व्हायला होतं. किती विचित्र असतं हे आयुष्य !

तर लेफ्टनंट अन्वर हुसेन पळून आला होता माझ्याबरोबर. जीवनसिंग न् फतेसिंग पण. ते तिघंही सामील झाले आझाद हिंद सेनेत. आंग्रेशू टेकडीच्या माथ्यावर चढलो होतो आम्ही तिघं. रात्री बरोब्बर आठ् वाजता चिता पेटून उठली होती. कर्नल सिप्सननं नक्कीच तंबूत बसून ते पाह्यलं असेल. पण निव्वळ सिप्सनच तेवढा काय म्हणून ! खानजोलहून मेजर आबीद हुसेन न् छामोलहून मेजर-जनरल कियानींनीपण ही चिता पेटलेली बघितली होती.

चितेचा इशारा ध्यानात घेऊन मेजर आबीद हुसेननं लगेचच दक्षिणेच्या वाटेनं प्रवासाला निघायची तयारी केली होती. पण हा प्रवास काही इतक्या सहजासहजी पार पडला नव्हता.

फार रात्र व्हायच्या आतच कर्नल सिप्सनला पत्ता लागला होता, की साखळी तोडून पक्षी एकटाच पळालेला नाही, तर तो पहारेकऱ्यांच्यासकट पळून गेलाय् ! आमच्या लोकांना दक्षिणेच्या बाजूनं माघार घेताना बघून चिता पेटवण्यामागची मखलाशीपण त्याच्या ध्यानात आली असेल कदाचित्.

रात्र संपायच्या आतच कैचीच्या पात्यांसारख्या दोन बाजूंनी दोन ब्रिटिश तुकड्यांनी आमची परतीची वाट बंद करायचा प्रयत्न केला. बेहद्द शौर्यानं शत्रूचा व्यूह भेदून आपल्या उरलेल्या चोपन्न सैनिकांना घेऊन सुरक्षित स्थळी जाता आलं होतं मेजर आबीद हुसेनना. ह्या छोट्याशा लढाईचं नेतृत्व मेजर आबीद हुसेननंच केलं होतं. सगळ्यांनीच शौर्याची शर्थ गाजवली. पण आम्ही दोघं भाऊ — म्हंजे तो रांगडा अन्वर न् मी रांगडा हरगोविंद—आम्ही मेजरसाहेबांचे डावेउजवे हात बनलो होतो. लढाईच्या वेळेला त्यांना आमची काहीच माहितो नव्हती. आम्ही दोघं होतं एका टेकडीच्या माथ्यावर. ब्रिटिश तुकडीच्या पाठीमागं ! दोन दिवसांनंतर वळसे घेत घेत ह्या माघारी जाणाऱ्या मंडळींच्यांत आम्ही येऊन मिळालो.

ह्या बारक्या लढाईतल्या प्रचंड चकमकीत शौर्य गाजवलं म्हणून नंतर आम्हा तिघांनापण सर्वोच लष्करी पदवी देण्यात आली. सरदार-इ-जंग ! पण नाही—ही पदवी सर्वोच्च नव्हती. अगदी एक नंबरची पदवी होती— शहीद-इ-भारत ! पण ह्रा मान जिवंतपणी मिळण्याजोगा नव्हताच मुळी ! प्राण वेचूनच तो मिळायचा ! नंतर शेर-इ-हिंद ! अन् त्याच्यानंतर सरदार-इ-जंग ! शिवाय भाई-ओ-हिंद, तंग-इ-बहादुरी, तंग-इ-शत्रुनाश वगैरे किताब होते. हे सगळे होते फौजी किताब ! बिगर-फौजी किताबपण होते. त्यांच्यात सगळ्यात मोठा किताब होता—सेवक-इ-हिंद ! हा किताब हबीबभाईनं मिळवला होता. आपली करोडो रुपयांची मालमत्ता फुंकून टाकून !

मेजर आबीद हुसेनच्या नेतृत्वाखाली

आम्ही मोंबाई-वाटेकवरनं कालेवाकडे चालत राह्यलो. सी-फोर्थ हायलँडर्सच्या तुकडयांनी वारंवार आमच्यावर गनिमी हल्ले चढवले. पण व्यर्थ. शत्रूची विमानं मधनं मधनं आमच्यावर बाँब टाकायची. तेव्हा आम्ही दिवसरात्र चालत होतो. घनदाट जंगलातली वाट. त्यामुळं दिवसा उजेडीतपण चालायला काही अडचण नव्हती. वाट तशी नावालाच पण आमच्या मनात भलतंच बळ संचारलं होतं.

मी डोकं भादरलं म्हणून आमच्या रेजिमेंटमधल्या कुणाच खालसा भाईनं माझी हेटाळणी केली नाही. उलट सगळयांनीच वचन दिलं--आमच्यापैकी ज्यांना कुणाला अमृतसरला पोचता येईल, ते ते माझ्या नावानं रामदास कुंडात एक बुडी मारतील.

एक रांगेत आम्ही चालायचो. जंगलातल्या पायवाटेवर मुंग्याच्या रांगेसारखे आम्ही एकामागोमाग चालायचो. प्रवासाचे हे दिवस उपाशीपोटीच कटले आमचे.

आम्ही होतो चोपन्न जवान अन् एक स्त्री. पण ह्या स्त्रीचं मनोबळपण अफाट होतं. प्रत्येक सैनिकासारखी तीपण पाठीवर स्वत:चा बोजा वाहायची. पंधराएक शेर तरी वजन असेल त्याचं.

मी म्हणायचो--ते मला दे ना!

ती म्हणायची--वा रे! निव्वळ माझा 'पिठू'च तेवढा घेऊन सुटायला बघतोस काय! माझ्या सकट मला उचलून घ्यायला पाह्यजेस तू!

मीपण म्हणायचो--ठीक आहे! ये! तूपण बस माझ्या खांद्यावर!

सुभद्रा म्हणायची--जिवंतपणी नको! पण मी मरून गेले तर मला खांद्यावरनं भारतात घेऊन जा!

म्हणायची--आमच्यात--म्हंजे हिंदूंच्यात कुणी आदिगुरु योगीराजाने म्हणे सहधर्मिणीचा मृतदेह खांद्यावर टाकून त्रिभुवनाला प्रदक्षिणा घातली होती.

नाना कष्टांनी भरलेल्या ह्या वाटचालीत सुभद्रेची सोबत हेच एकमात्र सांत्वन होतं मला. खूप जवळ येऊन गेलो आम्ही. एव्हाना तिचा माझा संबंध सगळयांनाच कळून चुकला होता. म्हणून सुभद्रेला सगळेच थट्टेनं 'भाबीजी' म्हणायचे.

तीपण चिडायची नाही!

[ क्रमश: ]

# साहित्य अकादमीचे एक्सपरिमेंट

सदानंद नाईक

दिनांक ११ जानेवारी १९७३. संध्याकाळचे सहा वाजले आहेत. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या प्रवेशद्वारापाशी संपूर्ण सूटातील दोन तरुण स्वागत करीत आहेत. समारंभाच्या वेगळेपणाची जाणीव येथेच होते. साहित्य अकादमीच्या मुंबई शाखेतर्फे "लघुकथामधील प्रयोग (एक्सपेरिमेंट) – मराठी, सिंधी व गुजराथी" या विषयावर परिसंवाद आयोजित केलेला आहे. अध्यक्ष आहेत गुलाबदास ब्रोकर. साहजिकच तिन्ही भाषातील काही लेखक, वाचक चाहते एकत्र येणार, खूप गर्दी होणार अशी अपेक्षा मनाशी बाळगून मी सभागृहात प्रवेश करतो. साठ सत्तर खुर्च्या मांडलेल्या असतात. पुढल्या दहा-बारा सोडल्यास बाकीच्या रिकाम्याच असतात. हळूहळू माणसे येतात तशी जातातही. श्रोत्यांची कायम संख्या तीस चाळीस एवढीच राहते. साडेसहाच्या दरम्यान समारंभास सुरुवात होते. व्यासपीठावर तिघा वक्त्यांखेरीज अध्यक्ष गुलाबदास ब्रोकर, प्रा. अनंत काणेकर व यावर्षीचे साहित्य अकादमी पारितोषिक विजेते सिंधी कथाकार श्री. गुनो समतानी बसतात. मुंबई शाखेच्या प्रमुख डॉ. सौ. भारती वैद्य प्रास्ताविक बोलतात. त्यावरून परिसंवाद इंग्रजीतून होणार हे कळते. म्हणजे एकूण तापच.

अध्यक्षांच्या हस्ते श्री. समतानींना पुष्पगुच्छ दिला जातो व परिसंवादास सुरुवात होते. सुरुवात करण्यासाठी श्री. ब्रोकर माईक हातात घेतात. माईक टेबलावर पडतो. ब्रोकर म्हणतात, आपल्या संपूर्ण भारतीय साहित्याची अवस्था अशी झालेली आहे – ते पडलेले आहे (त्यांना नेमके काय म्हणावयाचे होते हे कळले नाही. ते वाक्य देखील कदाचित नकळत त्यांच्या तोंडाबाहेर पडले असावे एवढेच.) ब्रोकरजी म्हणाले, 'सर्व साहित्यप्रकारामध्ये कथासाहित्य अधिक प्रगत आहे. भारतात काय घडत आहे हे भारतीय कथा साहित्यातून दिसते ' वगैरे.

मराठी कथासाहित्याबद्दल बोलताना प्रा. शांताराम पुरोहित म्हणाले, 'मराठी कथा साहित्याला पारंपारिक पार्श्वभूमि

आहे. योगायोगाने आजचा दिवस म्हणजे एका श्रेष्ठ कथाकाराचा—खांडेकरांचा ७५ वा वाढदिवस आहे. मराठी कथेतील खांडेकर, दिवाकर कृष्ण, य. गो. जोशी हा एक टप्पा आहे. त्यांच्या कथांची भाषा कृत्रिम होती, त्या कथा आदर्शवादी होत्या. तो आदर्शवाद जाऊन व्यक्तिचे लपलेले व्यक्तिमत्व उलगडवून दाखविणाऱ्या कथा लिहिल्या गेल्या. नंतर ग्रामीण कथा आल्या. पूर्वीची गुळगुळीत भाषा जाऊन जिवंत भाषा आली. लघुकथेचा घाट स्वतंत्र झाला. जी. ए. कुलकर्णींच्या वेगळे विश्व दाखविणाऱ्या वेगळ्या कथा आल्या. हा स्थित्यंतराचा टप्पा होता. नंतर नवकथांचा टप्पा सुरू झाला. बुद्धीनिष्ठ व कलात्मक पार्श्वभूमीवर आधारित कथा आल्या. दिलीप चित्रे यांच्या कथा चांगले इंग्रजी येत असल्याशिवाय समजत नाहीत. त्यांच्या कितीतरी कथांची नावे इंग्रजीत आहेत. बदलत्या समाजजीवनाचा, स्त्रीपुरुषांचे जवळचे संबंध वगैरेशी कथासाहित्याचाही संबंध आहे. कथेतील वास्तववाद अतिवास्तववाद याबद्दल सांगून ते पुढे म्हणाले – अलिकडे दुसराही एक प्रयोग मराठी कथेच्या प्रांतात होत आहे. तो म्हणजे कथाकथनाचा. हा प्रयोग जर कथासाहित्याच्या विकासासाठी आवश्यक असेल, उपयोगी असेल तर स्तुत्य आहे. पण तसा तो नाही. तो वेगळ्याच कारणासाठी होत आहे. लेखक व तो ज्या वातावरणात वावरतो त्यांचे परस्पराशी संबंध कसे आहेत हे सांगताना त्यांनी एक गमतीदार उदाहरण दिले. पत्नीला खूप सर्दी झाली आहे. तिच्या नाकाडोळ्यातून पाणी वाहत आहे. ती सर्दीने बेजार झाली आहे. अशावेळी पतीने तिच्याजवळ जाण्याची इच्छा प्रदर्शित करावी. आणि पत्नीने म्हणावे नका जवळ येऊ. तुम्हाला सर्दी होईल. पण सर्दीला न घाबरता त्याने तिच्या जवळ जावे. तशीच स्थिती लेखक व वातावरण यांची आहे. परिणामांची पर्वा न करता तो परिस्थितीला सामोरे जाणे पत्करतो.

गुजराती कथांबद्दल प्रा. चंद्रकांत बक्षी बोलणार होते. 'पॅरलिसिस'मुळे बक्षींच्याबद्दल काही वेगळ्या कल्पना अपेक्षा मनात होत्या. बक्षी सुरुवातीपासूनच अगदी आत्मविश्वासाने बोलत होते. त्यांनी गुजराती कथा साहित्याचा धावता आढावा घेतला. १९१२ पासून गुजराती कथा सुरू झाली, त्यातील काही महत्वाच्या टप्प्यांचा – धुमकेतू, मडियल, जयंती दलाल, गुलाबदास ब्रोकर यांचा उल्लेख त्यांनी केला. दुसऱ्या महायुद्धाचा कथेवर कसा परिणाम झाला, स्वातंत्र्यानंतरच्या कथांतून सर्व 'वाद' कसे आले, १९५५ नंतर स्वातंत्र्याबद्दलच्या आपल्या आशा-आकांक्षा–अपेक्षांचा चुराडा झाल्यामुळे आलेल्या नैराश्याचा पडसाद साहित्यातून कसा उमटू लागला, गुजराती कथेत गांधीवादाची पकड ही एक वेगळी समस्या कशी निर्माण झाली, त्यामुळे कित्येक चांगले लेखक देखील त्यांच्यावरील गांधीवादाच्या पकडीमुळे चांगले

लिखाण कसे करू शकले नाहीत. इ. गोष्टींचा त्यांनी ऊहापोह केला व कथा कादंबऱ्या का लिहिल्या जातात याचा विचार करून ते म्हणाले– समस्यांची, प्रश्नांची उत्तरे देणे हे कलाकाराचे, लेखकाचे काम नाही तर त्यांना सामोरे जाणे हे लेखकांचे काम आहे.

शेवटी सिंधी कथेबद्दल बोलणारे प्रा. हिरो शेखानी (हिंदीतून) म्हणाले, आमच्या मुलखातून आम्ही उखडले गेलो आहोत. आमच्यावर जी सांस्कृतिक संकटे आली त्यांची चित्रणे जेवढी व्हायला हवी होती तेवढी ती सिंधी कथांतून झालेली दिसत नाहीत. इतर भाषांप्रमाणे सिंधीतही प्रागतिक कथा लिहिली गेली. सिंधीतील प्रागतिक कथाकारांनी आपल्या उध्वस्त समाजाचे चित्रण करण्याऐवजी समाजवादी, साम्यवादी समाज या सारख्या सिंधी समाजाशी विसंवादी चित्रणावर भर दिला. त्या कथांतून कधी कधी आमच्या कँपांचे चित्रण आढळते. पण वास्तवापेक्षा घोषणांवर अधिक भर दिला जात होता. आमच्याकडे ग्रामीणकथेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जी काही आहे ती विखुरलेली, उखडलेली शहरी कथा. मात्र नवकथांतून व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाला मनाला महत्व दिले गेले. व्यक्तीचे अस्तित्व दाखविले गेले. अलिकडची हिंदी नवकथा लालपुष्प, मोहन कल्पना, समतानी सारख्या नवकथाकारांनी केलेल्या नवनवीन प्रयोगांमुळे समृद्ध होत आहे. आजच्या जीवनातील दुःखद अवस्था आजच्या सिंधी कथेत आहे. कथा सहेतुक नसावी तर ती अर्थपूर्ण असावी असे सांगून त्यांनी सिंधी भाषा हळू हळू नष्ट होत चालली आहे, काही वर्षांनी ती नष्ट होईल अशी भीती व्यक्त केली.

परिसंवादाचा समारोप करताना श्री. ब्रोकर यांनी शेखानीना दिलासा दिला. जोपर्यंत लालपुष्प, मोहन कल्पना, समतानी यांच्यासारखे समर्थ लेखक आहेत, सिंधी लोकांचा जिद्दी स्वभाव आहे तोपर्यंत सिंधी भाषा नष्ट होणार नाही. त्यांनी तशी भीती बाळगू नये. शेवटी ते म्हणाले– सर्व भारतीय कथांचा प्रवास एकमेकींशी समांतर आहे. पूर्वीच्या कथांतून आदर्शाचे – म्हणजे चांगल्यांचे चित्रण होत असे. आता वास्तववादाच्या नावावर अमंगल, कुरूप गोष्टींचे चित्रण होत आहे, पण त्या दोन्हीमुळे एक संपूर्ण चित्र तयार झाले आहे. वगैरे...

परिसंवादाच्या शेवटी चहापानाचा कार्यक्रम. परिसंवाद चांगला झाला पण भारतीय कथांतील प्रयोगाबद्दल – एक्सपेरिमेंटबद्दल फारच थोडे कळले. श्रोतेही अगदी कमी होते. त्यामुळे हा परिसंवाद म्हणजे साहित्य अकादमीचे एक 'एक्सपेरिमेंटच' ठरले.

● ● ●

## हिरवळ आणि होरपळ

पृष्ठ २४ वरून

धर्माने खादीत वावरणाऱ्या आणि पुढारी ही पदवी धारण करणाऱ्याला मज्जाव करणारा अधिकारी अजूनतरी जन्माला यावयाचा आहे. खारूची जमीन कुणी घ्यावी याबद्दल या चार सावकार भावात तीव्र मतभेद माजले. भिवंडी शहरापासूनचे बडे बडे धनिक एकत्र जमलेत. त्यांनी एक नामी तोडगा काढला. सर्वांनीच मनन करावा असा हा नामी तोडगा होता.

जमीन खारूची. तिचा लिलाव पुकारायचा आणि अट ही, की लिलाव या चार भावांव्यतिरिक्त परक्या पाचव्याने कुणी मागावयाचे नाही ठरले. लिलाव बोलण्यात अहमहमिकेने चारही भाऊ पुढे सरसावले. पण शेवटी सरशी झाली पुढाऱ्याची. दुकानाची १२०० रुपये उधारी दाखवून बळकावलेली जमीन पुढारी भावाने ३४ हजारात लिलावात घेतली. आता हे ३४ ह. रुपये द्यावयाचे कुणाला? कारण १२०० रुपये उधारी गेली ४।५ वर्षे जमीन कसवून खावून फिटली होती. तेव्हा १२०० चा काही संबंध नाही. तेव्हा ३४ हजारावर पुन्हा मतभेद माजले. लिलाव घेणारा भाऊ म्हणाला, 'मला यातला चौथा हिस्सा पाहिजे.' जुना अनुभवी सावकार म्हणजे मिठ्या पाटील. त्याने मध्येच उभे राहून निर्णय दिला—३४ हजार रुपये राहिलेल्या तीन भावांनी वाटून घ्यावे. मिठ्या शेटजींचा निर्णय चौघांनीही निमूटपणे मान्य केला. सावकार लोकांची केवढी ही एकजूट! आणि मजबूत शिस्त!! द्रौपदीच्या लिलावाचे वेळी खुद्द कौरवांचे बाजूलाही एवढी शिस्त असल्याचे आढळून येत नाही. बिचारी खारू चक्क गाव सोडून रिकाम्या हातांनी निघून गेली.

### कायदा आणि वस्तुस्थिती

महसूल मंत्र्यांनी गेल्याच महिन्यात एक लोकविलक्षण जाहीर तक्रार केली आहे. ना. हरिभाऊ वर्तक म्हणतात महाराष्ट्र सरकार कुळांच्याच केवळ हितासाठी भू-सुधार कायदे निर्माण करीत असते. पण महसूल न्यायाधिकरण जमीनमालकांच्या बाजूने नेहमी उभे ठाकते. त्यामुळे कुळांना सरकारच्या पुरोगामी कायद्याचा फायदा होत नाही.

पण महसूल मंत्र्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते काय करतात? तेच तर कुळांच्या जमिनी बळकावीत आहेत. भिवंडी तालुका पंचायतीच्या काँग्रेससदस्यांकडे कुळांच्या बेकायदा जमिनी आहेत. वसई तालुक्यातील कित्येक काँग्रेसपक्षीय सरपंचांनी महसूल अधिकाऱ्यांवर दडपणे आणून वारल्यांच्या जमिनी लुटल्याची उदाहरणे जिल्हा कलेक्टरांच्या टेबलावर पुराव्यानिशी पडलेली आहेत.

वसई तालुक्याचा पूर्व-दक्षिण आणि भिवंडी तालुक्याचा उत्तर-पश्चिम भाग संलग्न आहेत. नुसत्या भूगोलाने नव्हे तर इतिहासानेही. या संलग्न भागात प्रमुख वस्ती वारली समाजाची आहे.

बाहेरील सावकारांनी गेल्या १५ वर्षात या वारल्यांचे पुरे वाटोळे केले आहे. चिमीपाडच्या एका तलाठ्याने एका लेखणीत ८० वारल्यांना कबजेहीन करून सोडले आहे. ससुनवरच्या एका तलाठ्याने कुळाकडील जमीन स्वतःच्या अखत्यारीत मालकाला बहाल केली. त्याबद्दल वसईच्या ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटनी तलाठ्याविरुद्ध तीव्र स्वरूपाचे ताशेरे झाडले. पण शासनाने तलाठ्यास पूर्ण संरक्षण दिले आहे. कुथे, धामणे, बालखडी या वारली भागात ७।१२ चा उतारा पाहिजे असेल तर तलाठ्याला एक कोंबडी आणि आणि २० ते २५ रु. रोख मोजावे लागतात. त्या भागाचा सर्कल स्वतःच कलेक्टरचे अधिकार वापरतो आणि चक्क याची जमीन त्याला, त्याची जमीन तिसऱ्याला देतो. कमीजास्त कुणी तक्रार करण्याची सोय नाही. भिवंडी भागाचे डेप्युटी कलेक्टर श्री. यशवंतराव साळवी यांचे जवळ तशा तक्रारी आहेत.

पण कमाल केली वसई सर्कलने. याने वारल्यांच्या जमिनीत मध्ये सावकार घुसवून त्याचे कबजे सावकारांना देण्याचा सपाटा चालविला. कुळांनी वरिष्ठांकडे तक्रारी नेल्या. गेल्या १॥ वर्षांत या सर्कलजवळ तीन तहसिलदारांनी जबाब मागितले. पण एकाही तहसिलदाराला हा सर्कल जबाब देईना. जिल्हा कलेक्टर, प्रांताला हैराण करतात. प्रांत तहसिलदाराला हैराण करतात बिचारे तहसिलदार सर्कलची हांजी हांजी करतात पण त्याला तहसिलदारांची दया येत नाही. व तो जबाबही देत नाही.

हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण असे सर्कल, असे तलाठी म्हटले भाऊसाहेब वर्तकांच्या तालुक्यात आणि जिल्ह्यात दिवसा ढवळ्या उजळ माथ्याने वावरत आहेत. असे पुढारी आणि पदाधिकारी महसूलमंत्र्यांच्या पक्षातून ग्रामपंचायत, तालुका पंचायततीतून वावरत आहेत. मग नामदारांचा त्रागा कुणावर आणि कश्यासाठी ?

□ काक, नाग आणि साग यांना नैसर्गिक मृत्यु नाही अशी एक आख्यायिका आहे. काक आणि साग यांना त्यांचे त्यांचे खतपाणी, अन्न लागते. पण नाग केवळ हवेवर अनंतकाळ जगतो अशीही पुस्ती या आख्यायिकेत आहे. या आख्यायिकेचा कोणी पडताळा घेतल्याचे ऐकिवात नाही. त्यामुळे आधुनिक विज्ञाननिष्ठांना ही भाकडकथाही वाटेल.

पण केवळ अश्वासनावर वर्षानुवर्षे जीवन जगणारा 'प्राणी कोणी पाहिला आहे का ? नसल्यास या ठाणे जिल्ह्यात वारली या नावाने ओळखली जाणारी एक जमात आहे. ही जमात पुढाऱ्यांच्या आश्वासनावर वर्षानुवर्षे जगत आहे. भले तुम्ही त्यांची कितीही लूटमार करा, फसवाफसवी करा त्यांच्या बायकांची अब्रू लुटा, घरदार सर्वस्वी लुटा. फक्त त्यांना गोड गोड आश्वासने द्या. ते खूष होतात आणि सर्व काही विसरून जातात, चुकून पुढाऱ्यांच्या सत्तास्पर्धेत गुरफटलेत तर विचारतात जाब, काय झाले आश्वा-

सनांचे म्हणून.

पालघर तालुक्यातील हे देवखोपे गाव. वस्ती आदिवासींची पण जमिनी आहेत सावकारांच्या माण्डीखाली.

दुबे नावाच्या एका भय्या सावकाराची ओस जमीन रितसर कुळकायद्याप्रमाणे ६१-६२ साली प्रांताने १६-१७ वारल्यांना दिली. सावकार गेला दिवाणी कोर्टात पण प्रांताचा निकाल कायम झाला. सावकार गेला हायकोर्टात. हायकोर्टाने निकाल फिरवला. पण मुदतीत सुप्रीम कोर्टात अपील दाखल झाले. वारल्यांच्या वतीने सुप्रीम कोर्टाने स्टे दिला. पण तत्पूर्वी अक्षरशः रात्री कचेऱ्या उघड्या ठेवून हायकोर्टाच्या निकालाची अंमलबजावणी करण्यात आली. म्हणजे वारल्यांकडील कबजे काढून सावकारास दिले गेले. या दरम्यान सुप्रीम कोर्टाने वारल्यांच्या वतीने न्याय दिला. आज या गोष्टीला ५।७ वर्षे झाली. पण वारल्यांना जमिनीचे कबजे मिळत नाहीत. तालुक्यात मुख्यमंत्री नाईक येतात. पालकमंत्री वर्तक येतात. चहापाण्याची व्यवस्था सावकार लोकांकडे असते. भरल्या पोटी या उपाशी वारल्यांना फक्त ते आश्वासने देतात आणि भुर्रकन निघून जातात. आश्वासनावर वारली जगत आहेत.

— प्रभाकर म्हात्रे

# तीन

महाराष्ट्राचे महसूल मंत्री माननीय श्री. भाऊसाहेब वर्तक खालील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. ठाण्यातील प्रत्येक कांग्रेस कार्यकर्ता, जो पर्यंत भाऊसाहेब मंत्री आहेत तोपर्यंत आमच्या विरुद्ध कोणी कितीही तक्रारी केल्यास आमचे काहीच होणार नाही असे म्हणतात. हे कितपत सत्य आहे ? ते खरे आहे असा आमचा खालील गोष्टीमुळे समज झालेला आहे. तरी तो दूर होण्याचा प्रयत्न होईल काय ?

२. माजीवडे ठाणे ग्रामपंचायतीचा गैर कारभार, पैशांचा गैर व्यवहार व इतर महत्त्वाच्या बाबीसंबंधी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे केलेल्या तक्रारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांना त्वरीत चौकशी करण्याचा आदेश ता. ५-९-१९७२ रोजी दिला, तदनुसार एक्स्टेंन्शन ऑफिसर श्री. राजे, पंचायत परिषद ठाणे यांनी चौकशी अहवाल १ नोव्हेंबर १९७२ च्या पहिल्या आठवड्यात पाठविला. त्यानंतर काहीच कार्यवाही झाली नाही म्हणून कलेक्टर, ठाणे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, ठाणे यांना स्मरण पत्रके पाठवूनही त्यांचेकडून अजूनपर्यंत काहीच उत्तर

आलेले नाही.

३. स्टेट सी. आय. डी मार्फत ही चौकशी झाली आहे पण प्रत्यक्षात ? आपल्याला वडिलांचे नावे महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाचे वर्तक नगर ठाणे येथे बांधलेल्या कामगार वसाहतीत असलेला सर्वे नं. ४०४ चा प्लॉट महाराष्ट्र गृह निर्माण मंडळ त्या जागेचा वापर करत व केला असताही मे. कलेक्टर सो. ठाणे यांनी ता. १-१-७३ रोजी ज्या प्रमोटर्सनी बहुतांशी दुकानदार, भाजी व फळे व मासळी विकणाऱ्या बाया यांच्यावर सभासद करून घेण्याचे बाबतीत अन्याय केला असताना व त्या संबंधी रजिस्टर ऑफ को ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी. मे. कलेक्टर, ठाणे यांना पूर्वी कळवूनही महाराष्ट्र गृह निर्माण मंडळाची पूर्व संमती न घेता जागा ताब्यात दिली.

४. गेली ७ वर्षे सर्व प्रकारची तंत्रे वापरूनही व आपणास प्रत्यक्ष भेटून तसेच पत्र व्यवहाराने कळविले असतानाही वर्तक नगर येथील शाळेचा प्रश्न तसाच लोंबकळत पडलेला आहे.

अशा प्रकारच्या अनेक गोष्टींचा संच आमचे जवळ आहे. त्यातील वरील ठराविक गोष्टींच्या खुलाशांची आपणाकडून अपेक्षा करतो. तसा केल्यास किंवा योग्य ती कार्यवाही करण्यास आपण निःपक्षपातीपणे सरकारी अधिकाऱ्यांना आपण ठाणे जिल्ह्याचे पालक मंत्री म्हणून आदेश दिल्यास आपले कार्यकर्ते आपल्या विरुद्ध प्रचार करतात असे आम्हास वाटेल. वरील प्रकार चालूच राहिल्यास व जनतेच्या पैशांचा गैरवापर थांबविण्यात न आल्यास परिस्थिती मात्र चिघळत जाईल व जनता सरकारच्या नावाने दोन्ही हाताने टाहो फोडत बसेल व त्यातील दुबळ्या मनाची माणसे या जगांचा आपण लक्ष न दिल्यास कायमचा निरोप घेतील.

—अरविंद नारायण इंदप, ठाणे

---

# चार

पाचसहा उपसा-जल-सिंचन योजनांपायी या आदिवासी जव्हार-तालुक्यात सुमारे आठ लाख रुपये यापूर्वीच गंगार्पण झाले! आता दुष्काळाच्या गदारोळाखाली आम्ही भगिरथाच्या पुत्रांनी तालुकाभर मुख्यत्वे रस्त्यांच्या कामांची धमाल चालवली आहे! जीप्स; फटफटया, फुकूऽऽचकू आणि (मंडळी, श्वास रोखून धरा) दररोज तीस हजार रुपये उडताहेत! येवढ्या खर्चात तालुक्यातील लागवडीखालील १,११,९१७ एकरांतील दगडगोटे वेचून, डागडुजी-मशागत झाली असती व निश्चितपणे अधिक धान्य पिकले असते!

—अशा या निरुत्पादक खर्चाच्या

(व ना. मुख्यमंत्रीसूचित करवाढीच्या) संदर्भात, जव्हार तालुक्यात आजमीतिला सोलापूर वगैरे जिल्ह्यांसारखी दुष्काळाची तीव्रता खरोखरच आहे काय याची तज्ज्ञांकडून ताबडतोब कसून तपासणी झाली पाहिजे. कारण गेल्या चार महिन्यांपासून राजेशाही थाटात चाललेल्या या दुष्काळी कामांमुळे, मजुरांभावी जंगलखात्याची ९,३६७० एकर क्षेत्रफळातली कामेसुद्धा काहीशी रखडलीत!

—चैत्रवैशाखात ठीक आहे. पण घनदाट छाया, पाने, फुले, मोहोर व फळांनीयुक्त वनराजी असलेल्या, समुद्रसपाटीपासून सतराशे फूट उंचीवरील जव्हारला रोजी येवढा खर्चकरून, आपण ना मुख्यमंत्र्यांचे हात खरोखरच बळकट करीत आहेत का ?

—मला भीती वाटते, लोकांना आपण आळशी बनवतो आहोत! आणि आश्चर्य वाटते, अधिकाऱ्यांच्या ही गोष्ट लक्षात कशी येत नाही ?

—चौकशीअंती काणी तज्ज्ञ मार्गदर्शन करून आमच्या ज्ञानात भर घालील काय ?

**जॅक अँडरसन जव्हार, (ठाणा)**

● ● ●




# कलकत्ता जिवंतच राहील ! !

सौ. तारा पंडित

जगात दुर्दशेला पोचलेल्या शहरांमध्ये कलकत्त्याचा पहिला नंबर लागतो. माणसाला राहण्यास अतिशय धोक्याचे, अत्यंत अधोगतीला पोचलेले आणि नजिकच्या भविष्यात पूर्णांशाने अस्तमान होणारे हे शहर आहे, असे भाकीत जॉफरी मूरहाऊस नावाच्या विद्वानाने केले आहे. आधुनिक कलकत्त्यावर विस्तृतपणे लेख लिहिणारा हा पहिलाच लेखक होय.

श्री. मूरहाऊस म्हणतात की, ह्या नगरीच्या विनाशाची सुरुवात एखाद्या साथीच्या रोगाने होईल. कारण शंभर वर्षांपूर्वी जेसप आणि कंपनीने टाकलेले पाण्याचे पाईप आपली कालमर्यादा कधीच ओलांडून कसेबसे तग धरून आहेत. आता त्यांच्याभोवती गटाराच्या पाण्यात भिजलेली मातीची ढेकळे चिकटून बसली आहेत. ते पाईप केव्हा फुटतील याचा नेम नाही. त्यांचा स्फोट झाला की, म्हातारीकोतारी तर मरूनच जातील पण तरुण मंडळींना होणारे नुकसान बघवणार नाही. ते दुःखाने वेडे होतील, रागाने लाल होतील. मग तेही आणखी विनाश करण्यास प्रवृत्त होतील. जळत्या मशाली, चाकूसुरे, बाँब, जे काय हाती लागेल ते घेऊन ते धावत सुटतील. जाळपोळ करतील, मारहाण करतील, पळून जाणारांचेदेखील खून पाडतील आणि हा विध्वंस अशा थराला पोचेल की, कलकत्ता शहराचा बाह्य जगाशी संपर्क पूर्णपणे तुटून जाईल. टेलिफोन करणे कठीण होईल, रस्ते बंद होतील, रेल्वे उद्ध्वस्त होतील आणि डमडमला येणारी विमाने क्रुद्ध लोकांच्या हल्ल्यांना बळी पडतील, आतील उतारूंचा निर्दयपणे संहार होईल. मग कित्येक दिवस कलकत्त्याची कोणतीच बातमी बाहेरच्या जगाला कळणार नाही. सारे जग नवल करीत राहील— ह्या कलकत्ता शहराचे झाले तरी काय? कुतुहल म्हणून ठिकठिकाणचे लोक हुगळी नदीच्या काठी होड्यांनी येऊन पोचतील. हजारो, लाखो निर्वासितांचे जथ्थे ओलांडून ते आत प्रवेश करतील तेव्हा त्यांना शोध लागेल की, अवशेषांनी

व्यापलेलं हे एक मोठं शहर आहे आणि एकमेकांच्या जीवावर उठलेल्या काही रानटी लोकांचंच तेथे राज्य आहे !

...मूरहाऊसच्या ह्या वर्णनाव्यतिरिक्त सोडम व गोमोरा यांनीही अशाच तऱ्हेचं वर्णन केलेलं आहे. अनेक परदेशी निरीक्षकांनीदेखील कलकत्त्याच्या भवितव्याविषयी जबरदस्त औदासिन्य व्यक्त केले आहे. मूरहाऊसप्रमाणेच इतरांनीही कलकत्ता शहराची बारकाईने पाहणी करूनच आपली विधाने मांडली आहेत व ह्या नगरीचा विध्वंस निश्चित असल्याचे भाकीत केले आहे. अर्थात् कलकत्त्याची प्रचलित अवस्था शोचनीय आहे हे नाकबूल करून चालणार नाही. नजिकच्या भविष्यात येथे जीवन जगणेच मुळी शक्य होणार नाही जर तातडतोब व शीघ्र उपाययोजना अमलात आणली तरच काही तरणोपाय आहे. नाहीतर ही नगरी गर्तेत जाणार हे ठरलेलेच आहे !

तसं पाहिलं तर वीस हजार लोकांसाठी उभारलेलं हे शहर कित्येक लाख लोकांचा भार वहात आहे आणि तरीही तग धरून आहे, हा एक चमत्कार भासत असला तरी वस्तुस्थिती तशी नाही. कदाचित् मूरहाऊसच्या कल्पनेप्रमाणे रस्त्याखालून नेलेल्या पाईपांचा फुटून स्फोट व्हायचाच असेल तर अजून अवकाश असावा; कदाचित् कलकत्त्यात राहणाऱ्या लोकांची रोग-प्रतिबंधक शक्ती वैद्यकीय पुस्तकातून नमूद केलेल्या उपचारांपेक्षाही अधिक असावी...काहीही असो, अत्यंत हलाखीची परिस्थिती असूनही येथील वाहतूक सुरूच आहे, नळातून पाणी बरोबर पडतेच आहे, इलेक्ट्रिकचे दिवेही व्यवस्थित जळताहेत...

जर परदेशी निरीक्षक कलकत्त्याची अवस्था अतिशयोक्तिपूर्वक कथन करीत असतील तर ते केवळ येथील लोकांच्या निमूट सहनशक्तीमुळेच. स्वदेशी परत गेल्यावर ते कल्पनाच करू शकत नाहीत की, कलकत्त्यासारख्या शहराच्या विलक्षण वाईट परिस्थितीत लोक जिवंत तरी कसे राहू शकतात. अद्ययावत आरोग्यपरिपूर्ण शहरातून उचलून कलकत्त्याच्या झोपडपट्टीत ह्या लोकांना आणून फेकले तर ते कसे वागतील ? त्यांची प्रतिक्रिया नक्कीच जबरदस्त राहील. पण ज्या लोकांचा जन्मच माशा आणि डास यांच्या सान्निध्यात झाला आहे आणि पिढ्यान् पिढ्या ते त्यांच्याच सहवासात राहात आले आहेत. त्यांची प्रतिक्रिया तेवढी तीव्र कशी असेल, ती बोथट होणारच ! आता पूर्वीपेक्षा परिस्थिती आणखीच खराब झाली आहे हे निश्चित. पण पूर्वी वाईट अवस्था नव्हतीच असं तर नाही ना ? ती तेव्हाही होतीच. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला परकीय लोक ह्या शहराला भेट देऊन गेल्यानंतर त्याचं वर्णन 'सिटी ऑफ पॅलेसेस्' अशा शब्दात करीत. पण त्यावेळी त्यांच्या डोळ्यासमोर फक्त युरोपियन कलकत्ता (–चौरंगी विभाग–) उभा राही. शहराचा बाकी सर्व भाग झोपडपट्टीतच जमा असे. त्याचं वर्णन माकिनतोष

यांनी १७८० मध्ये 'ब्लॅक टाऊन' किंवा 'नेटिव्ह कलकत्ता' म्हणून केलेलं आहे.

एक गोष्ट मात्र सत्य आहे की कॅलिफोर्नियाच्या अतिपश्चिम टोकापासून तो जपानच्या अतिपूर्व किनाऱ्यापर्यंत कलकत्ता वगळता असे एकही ठिकाण नाही; जेथे न्याय नाही, अभिरूची नाही, सभ्यता नाही, सोय नाही; उलट वाटेल तशी घरांची गर्दी आहे, झोपड्या, छप्परे, गटारं, डबकी, गल्ल्याबोळ आणि रस्ते इत्यादींची नुसती खिचडी झालेली आहे. मार्किनतोषानी यावर उपाययोजना सुचवल्या होत्या पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, जसे नेहमीच कोणत्याही सूचनांबाबत होत असते. १८४८ मध्ये शहराची देखभाल करण्यासाठी प्रथमच एक कमिशन नेमण्यात आले. १८५९ मध्ये गॅसलाईट आले. त्याच सुमारास १०० लाख रुपये खर्चून 'ड्रेनेज सिस्टिम' अस्तित्वात आली. १८७० मध्ये १५० लाख रुपये खर्चून पाणीपुरवठा पद्धती सुरू झाली.

आणि सांस्कृतिक क्षेत्रात काय झाले? १७८४ मध्ये एशियाटिक सोसायटी स्थापन झाली. मानवशास्त्राचा व सायन्सचा विशेष अभ्यास सुरू झाला. इ. स. १८१७ मध्ये हिंदु कॉलेज-भारतातील पहिली वहिली इंग्रजी शिक्षणसंस्था स्थापन झाली. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडून आल्या. १८८५ मध्ये इंडियन नॅशनल कॉंग्रेसचा पाया रचला गेला....अशी अनेक तऱ्हेने प्रगती देखील झाली. म्हणूनच कलकत्त्यातील जीवनावस्था अगदी खालच्या थराला जाऊन पोचली असली तरी भारतातील सर्व शहरांमध्ये कलकत्ता हे राजकीय, कलात्मक आणि बौद्धिकदृष्टया अत्यंत जागरूक राहिले आहे असे म्हणणे वावगे ठरू नये.

हे सगळं खरं असलं तरी त्यामुळे सुरक्षिततेची ग्वाहीही देता येणार नाही. इतिहासात अशी पुष्कळ उदाहरणे आहेत की आतल्या आत धुमसणाऱ्या ज्वालामुखीच्या शिखरावर बसले असताना आपणाला लवकरच भयानक मृत्युशी सामना करावा लागणार आहे याची लोकांना कल्पनाही नसे. सुदैवाने आपण भविष्यातील आपत्तीविषयी जागरूक तरी आहोत. कलकत्ता शहराला हळूहळू का होईना नवे स्वरूप प्राप्त होत आहे. मोठमोठे तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि राजतंत्रज्ञ यांनी भारताच्या नवीनीकरणात निश्चितच भर घातली आहे. अति चांगलं नष्ट होत असलं तरी अति वाईट असलेलंही वितळून जात आहे. म्हणून कलकत्ता सोडून जावं हे सुचवणं अगदीच 'वेडेपणाचं आहे. शहराची अवस्था कितीही खराब झाली तरी त्याचा पूर्णतः विनाश होणे शक्य नाही. कलकत्ता जिवंतच राहील!

● ● ●

राजापुरात

# एक गाव, एक पाणवठा

रतनलाल भंडारी

डॉ. बाबा आढाव जानेवारी महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात राजापुरातील दुर्गम खेड्यांतून आपली 'एक गाव एक पाणवठा' यात्रा घेऊन जाणार म्हटल्यावर सर्वांच्या मनात एक औत्सुक्य उभे राहिले. या मोहीमेच्या आखणीत माझा बराचसा वाटा असल्यामुळे समाजवादी पक्षातील साथींसह सर्वजण प्रश्न विचारीत, 'अहो कोकणात तशी अस्पृश्यता आहे कुठे ? इथे सर्वांच्या वाड्या अलग अलग असतात. दूर असतात. मग पाणवठा होणार कसा ? मग बाबांच्या या मोहिमेमागील समाजपरिवर्तनाचे चक्र कोणत्या दिशेने मार्गाक्रमण करते आहे हे मला समजून सांगावे लागे. समाजातील या प्रश्नांना आपण हात घातला तर निवडणूकीत निश्चित मार खाण्याची पाळी येईल याचा सर्वांनी जवळ जवळ धसका घेतलेला असतो. बाबांच्या प्रबोधनाचे कार्य त्यांना अडथळ्यासारखेच वाटत असते. हा खुळेपणा हा तरुण नेता करून आपल्याच झोळीत धोंडा पाडून घेतो आहे असा अनेकांचा आक्षेप असतो. नेमकी याच वेळेस राजापूरला 'गंगा' अवतीर्ण होते. धार्मिकतेच्या नावाखाली सहली ठोकणाऱ्या मंडळींना आणि गंगेवर मानवांची पापे धुवून तीर्थ द्यावयास बसलेल्या ब्रह्मवृंदांना ही पर्वणीच असते. मला वाटते समाजपरिवर्तनाची गंगासुद्धा महाराष्ट्रात अशीच अचानक उद्‌भवते. त्या गंगेत महाराष्ट्रातील सामाजिक पापांची धुणी धुतली जातात. ज्योतिबा, विठ्ठल रामजी शिंदे, भाऊराव पाटील, डॉ. आंबेडकर, महर्षी कर्वे इत्यादींच्या कुंडातून ती अवतीर्ण होते. त्या काळात जे काही सामाजिक परिवर्तन होईल तेवढे होऊन जाते आणि मग युगायुगांच्या पापांचा भार वाहात समाजाची वाटचाल चालूच रहाते. डॉ. आढावांची समाजपरिवर्तनाची गंगा याच वेळेस राजापुरास यावी हा असाच योगायोग नव्हे काय ?

बाबांच्या दौऱ्याची सुरुवात राजापूरला होणार असली तरी बहात्तर साल

विज्ञत असताना रत्नागिरीत त्यांच्या विचारांची ओळख व्हावी म्हणून सभा ठरलेली होती. सभेला स्थान विठ्ठल मंदिर. विठ्ठलाची पूजा बंद करणारा कुणी आढाव मंदिरात भाषण करणार म्हटल्यावर रत्नागिरीतली सनातनी मंडळी तक्रार करतात. मंदिराच्या व्यवस्थापकांना अडचणीत टाकतात. मग व्यवहार म्हणून भाषणाची जागा बदलण्यात येते. नियोजकांच्या मदतीला सुदर्शन चक्रधारी कृष्ण धावून येतो. मग सभा राधाकृष्ण मंदिरात सुरू होते. गंभीर वातावरणांची एक अस्पष्ट चादर सर्वच सभेवर पसरलेली असते. सभेला गर्दी यथातथाच असते. पण स्पिकरची सोय नसल्यामुळे सगळे मंदिरात जमतात . बाहेर अंगणातून बाबांची 'शोभा' पहावयास आलेली मंडळी एक तर काढता पाय घेतात अथवा बाबांच्या सभेत जरा सोवळ्याानेच बसतात. बाबांचा संथ पण धारदार स्वर मंदिराच्या मंडपातून घुमू लागतो. आपल्या पुणे जिल्ह्यातील दौऱ्यांचे अनुभव सांगून बाबा विचारतात 'समाजातील ही अल्पसंख्य-बहुसंख्य विभागणी शाश्वत रहाणार आहे काय?' असा दुभंगलेला समाज, दलितांवर अन्याय करणारा समाज लोकशाहीचे कोणते मदिर उभारणार आहे? बाबांच्या शब्दातून व्यक्त होणारे समाज चित्र भिषण असते. बाबांच्या वाणीतला मी पूर्वी अनुभवलेला आक्रमकपणा गेलेला असतो. पूर्वी जेव्हा राजकीय आखाड्यातील बाबांची भाषणे मी ऐकली, जवळून निवडणूकीच्या गदारोळात त्यांना पाहिले तेव्हा बाबा म्हणजे तुफान गोलंदाजी करून प्रतिपक्षाला नामोहरम करणारी मुलूख-इ-मैदान होती. पण आता बाबांच्या प्रत्येक शब्दामागे त्यांच्या अंतःकरणातील तळमळ, समाजाच्या प्रस्थापित सत्तेविरूद्धची, व्यवस्थेविरूद्धची ठसठसणारी व्यथा बोलकी होत जाते. त्यात आक्रमकपणा अभावानेच असतो. जण बाबा स्वतःच्या विरुद्धच युद्ध करीत आपल्या मनातील मंथन श्रोत्यांपुढे ठेवीत असतात.

दुसऱ्या दिवशी बाबांचा मुक्काम काही कारणांमुळे रत्नागिरीसच रहातो. मला वाटते, बाबांना रत्नागिरीच्या विद्वजनांशी ओळख करून द्यावी. किल्ला, बंदर, दाखवावे. पण बाबांना त्यात रस नसतो. एका विद्वान संपादकांच्या घरी चक्कर मारून होते. पण ते घरी नसतात. परत येताना वाटेतच भेटतात. थातूरमातूर बोलून रस्त्यातच बाबांची बोळवण करतात. साधे गृहस्थाला अभिप्रेत असलेले आगत्यही दर्शवीत नाहीत. या महाशयांनी बाबांवर टीकालेख लिहिलेले असल्यामुळे त्यांना समजून घ्यावे अशी माझी अपेक्षा असते. बाबांनी विठ्ठलाची पूजा शासनामार्फत करण्याचे घटनाविरोधी कृत्य बंद पाडल्यामुळे डॉ. बाबा आढाव हेच आता अस्पृश्य झाले आहेत अशी जाणीव मलाच छळत जाते. बाबा फक्त एक सुस्कारा टाकतात. त्यांना जणू ते अपेक्षितच असते. मग बाबा परतण्याची

चौकशी करतात. मग बाबांना आणि मला जीवाभावाची माणसे भेटतात. आपल्या दुःखांना व्यक्त करण्यासाठी शब्द हुडकणारे चेहरे सांगतात, 'बाबा-साहेब, अॅटमबॉम्ब पडून ही धरणी जाळून पोळून निघाली तरी त्यातून गवताच्या काडीबरोबर पुन्हा अस्पृश्यता जन्माला येईल इतकी ती या मातीच्या कणाकणात भिनलेली आहे.' गप्पा रंगतात. अस्पृश्यतेच्या प्रश्नांच्या विविध छटा माणसे सांगतात. अनंत अनुभवातून एकच सूर माझे अंतःकरण छेदत रहातो. 'कॉम्रेड, ही लोकशाही नाही, ही विटंबना सतरा पिढ्यांची मूग गिळून पोसलेली' (नामदेव ढसाळ–गोलपिठा ७६) आपल्या गुलामीची, पिढीजात बंदिवासाची इतकी खात्री असलेला समाज मरणे परवडत नाही म्हणून काया जगवीत जगत असतो. सावंत-वाडी, बांद्याकडचे अस्पृश्य अद्यापही मृत जनावरांचे मांस खातात हे ऐकल्यावर डोके सुन्न होते. हे सारे सांगताना त्या आंबेडकरांचे अनुयायित्व पत्करलेल्या नजरेतून विखार बाहेर पडत नाही. त्या नजरेला अद्यापही अभिप्रेत आहे कुणी एक आंबेडकर. कुणी एक महात्मा. स्वतःच्या बाहूंनी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अन्यायाविरुद्ध लढण्याला आपण पांगळे आहोत हीच वंचना प्रत्येक उद्गारातून साकारीत होते. आपण मुक्त आहोत हे समजूनही, दीर्घ-काळातल्या बंदीवासातून सुटल्यावरही तुरुंगातल्या अंधाराकडे धावणारे पॅरीस क्रांतीतील बंदी माझ्यासमोर नाचत असतात.

दोन तारखेला बाबा राजापूरला रवाना होतात. राजापूरच्या मोहिमेची क्रमवार आखणी मला ठाऊक नसते आणि मग बाबांचे पत्र धाडकन येऊन थडकते. बाबा लिहितात, 'प्रिय रतन-लाल, राजापूर गंगेचा पाणवठा पहाण्या-साठी तीन तारीख गृहीत धरून आताच त्या पाणवठ्यावर जाऊन आलो. राजा-पूरपासून १।।–२ मैलाच्या अंतरावर अर्जुना नदीवर, पलीकडच्या तीरावर ४००–५०० फूट उंचीवर ही कुंडे बांधलेली आहेत. दर तीन वर्षांनी येणारी गंगा कालच प्रकट झाली. त्यामुळे अजून गर्दी नाही. तरीही अंघोळीसाठी येणाऱ्यांची संख्या वाढती आहे. नदीच्या पात्राशेजारी गरम पाण्याचे कुंड–तेथे एक अंघोळ–तसेच ओलेत्याने वर टेकडीवर गंगेच्या अंघोळीला जावयाचे. तेथे ८–९ कुंडे आहेत. वेगवेगळी नावे आहेत. (उदा. सूर्य कुंड) दोन ब्राह्मण मुख्य कुंडाजवळ उभे होते. कुंडात कोणी आत जात नव्हते. तेच पाणी काढून आंघोळी घालीत होते. परंतु पाच कुंडातील गोमुखातून पडणाऱ्या पाण्यात सर्वांना प्रवेश होता. कदाचित स्वच्छतेसाठी सोय असावी. बनेश्वरसारखेच बांधलेले देऊळ आहे. साखर-फुटाणेवाल्याजवळ चप्पल ठेवून सारा परिसर पाहिला. कुणब्यांचीच गर्दी अधिक...येथे अहिंदूंना प्रवेश नाही. अहिंदू म्हणजे मुसलमान, ख्रिश्चन इ.

माझा प्रश्न : बुद्ध वगैरे हरिजनांना?

उत्तर : ते कोठे हिंदू आहेत ?

: चांभार वगैरेंना ?

: प्रवेश आहे पण ते कोठे येतात !

या दोन भटांनी जाहीर हँडबील पाहिले असावे. मला लगेच ओळखले. त्यामुळे उत्तरात सावधपणा होता—

आपला स्नेहांकित—बाबा आढाव '

बाबांना भेटलेल्या 'धाकटयाची' ही कथा. राजापूर जवळच्या एका छोटया खेडयातील ग्रामपंचायतीचा तो सदस्य आहे. शासनाने ठेवलेल्या राखीव जागांच्या बंधनामुळे अशा उपाधी या समाजाच्या वाटयाला येतात. तो जातीने चांभार. निळसर घाऱ्या डोळयांचा, गौरवर्णी, गालावरची हाडे वर आलेला हा माणूस स्वतःची व्यथा सांगू लागतो. त्याचे दुःख असते साधे. गावातला न्हावी त्याची हजामत, दाढी करीत नाही. त्यासाठी त्याला राजापूरला एस. टी. ने जावे लागते. पोलीसाकडे तक्रार केली तर चौकशीचे नाटक होते. न्हावी सांगतो माझे दुकानच नाही. मी खाजगी घरी जाऊन करतो. त्याचीही अडचण असते. त्याला बिचाऱ्याला धंदा नको का असतो, पण स्पृश्य समाजातील त्याची गिऱ्हाइकं बिथरतात. हे उदाहरण सांगून बाबा विचारतात 'म्हशींची भादरून तुमच्या समाजाला बाट लागत नाही. किती दिवस हे चालणार आहे ? १९५५ च्या अस्पृश्यता निवारण कायद्याने शब्दांनी अस्पृश्यता पाळणे, खाजगीतही ती आचरण हा गुन्हा ठरवलाय ना ? किती पोलीस अधिकाऱ्यांना हे ठाऊक आहे. का नाही या सामाजिक अन्यायाशी लढावयाचे ?'

आणखी एक उदाहरण. देवी होसूळ येथील एक समारंभ. कै. गो. रा. जाधवांच्या स्मारकाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम. समितीच्या समाजवादी सभापतीपासून ते काँग्रेस आमदारापर्यंत सर्वांची हजेरी. कै. जाधवांनी अस्पृश्यांच्या मुलासाठी राजापूरला वसतिगृह उघडून सामाजिक कार्यात, शैक्षणिक कार्यात मोलाची भर घातलेली. बाबांना कुणीतरी बोलावयास सांगते. सभापती आग्रह करतात. मग बाबाचे भाषण. 'त्या थोर पुरुषाचे स्मारक व्हावे म्हणून तुम्ही सात आठ हजार रुपयं खर्च केलेत. त्या माणसाने उभ्या केलेल्या राजापूरच्या जिवंत स्मारकांची आज काय स्थिती आहे. त्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची जेवणाची सोय नाही. जवळ पैशाची ऐपत नाही. आज उपाशी पोटी ही मुले शिक्षण घेत आहेत.' सगळेच चक्रावतात. बाबांनी राजापूरच्या मुक्कामात ही माहिती केव्हा गोळा केली याची सभापतींनाही कल्पना नसते. पण बाबा, विद्यार्थ्यांची नावे घेऊन त्यांनी सांगितलेल्या व्यथा सांगत असतात.

पदयात्रेची सांगता होते विलयाला. खरं तर तो स्वल्पविरामच असतो. पन्नास एक समाजवादी विचारांचे कार्यकर्ते, शिक्षक जमलेले असतात. विलये हे खास कोकणी संस्कृतीचे, निसर्गाचे गाव. खाडी काठी वसलेल्या या गावात जिकडे नजर टाकावी तिकडे पोपटी रंगाची, हिरव्या सृष्टीची विविध रुपे, छटा पाहावयास मिळतात. खाडीच्या

दोन्ही अंगाला फुललेली पावसाची शेते तर बघणारांची नजर हालू देत नाहीत. खाडीचे पात्र घाटावरल्या मोठ्या कॅनॉलसारखे पाण्याने भरलेले. त्यातून ध्यानस्थ बसलेल्या योग्यासारख्या छोट्या गलबतांच्या डोलकाठ्या, पगार. सकाळी सगळ्या हिरव्या सृष्टीवर दाट धुके.

आचार्य जावडेकर विद्यालयाच्या सभागृहात मेळाव्याला सुरुवात होते. सुरुवातीलाच मला बोलावे लागते. समाजवादी चळवळीतील होणारे प्रमुख बदल सांगत समाजवादी चळवळीचा नवा स्तर शेतमजूर, दलित व युवक आहेत हे मी आवर्जून सांगतो. मग यजमान म्हणून राजापूरचे सभापती श्री. भिकाजीराव चव्हाण बोलावयास उभे राहतात. समाजवादी चळवळीच्या व्यथांचा असा काही आलेख ते उभार-तात की प्रत्येकजण भारावून जातो. त्यांचे शब्द साधे असतात. पण त्यामागे उभी असते सातत्याने समाजवादी चळवळीत झिजविलेल्या हाडांची व्यथा. बाबांचे आभार कोणत्या शब्दात मानावेत त्यांना कळत नाही. शेवटी ते सांगतात 'नाथ पैंच्या या कर्मभूमीत तुम्ही या. राजापूरच्या या परिसरात समाजवादी नेतृत्वाच्या कृतीशील कर्तृत्वाचा कस लागू दे. त्यांनी राजापूरची प्रयोगशाळा बनवावी. समाजवादाची कृतीशील ज्वाला या ठिकाणी प्रज्वलित झाली तर राजापूरच्या प्रत्येक समाजवादी कार्यकर्त्याला कृतार्थता वाटेल.'

मग बाबा आपले नववर्षच्या पंधरावड्यातील अनुभव, समाजदर्शन तारीखवार कार्यकर्त्यांपुढे मांडतात. समाजवादी चळवळीची व्यथा व्यक्त करताना ते सांगतात 'अरे, राजनारायणसारख्या इरसाल माणसाने जोशी, गोरे, दंडवत्यांचे, मधू लिमयांचे नेतृत्व ब्राह्मणांचे आहे म्हणून शिवी हासडताच उत्तर प्रदेश, बिहार मधील पक्ष का दुभंगतो याचा आपण खोलवर विचार केला पाहिजे. समाजवादाचा लढा आता प्रत्येक गावागावातून लढावा लागणार




आहे. रतनलाल म्हणतात त्याप्रमाणे अदृश्य शक्तीशी झुंजण्याची बौद्धिक लढाई थांबली पाहिजे. आजवर सामाजिक संघर्षाचे प्रश्न शिताफीने टाळण्यात समाजवादी चळवळीने कसब दाखविले आहे. आता नवा संघर्ष उभा राहील. या संघर्षामुळे निवडणूकीत मते मिळणार नाहीत. म्हणून भिण्याचे कारण नाही. नाहीतरी निवडणूकीसाठी पथ्ये पाळून असे काय मोठे पदरात पडले आहे ? नव्या सामाजिक संघर्षाचे पाईक तुम्ही आम्ही झाले पाहिजे.'

नंतर खूप चर्चा होते. कार्यकर्त्यांच्या अडचणी, शंका यांची मैफील रात्री बारा पर्यंत सुरूच असते. बाबा स्वत: ज्योतिबांची प्रार्थना गाऊन दाखवतात. त्यांच्या प्रार्थना गीतांना आकाशवाणी स्वीकारीत नाही म्हणून हळहळतात. मग करमणूकीच्या गप्पा टप्पात आणखी एक तास जातो. मकर संक्रातीने आपले पाऊल टाकलेले असते.

दुसऱ्या दिवशी बाबा पुण्याला जावयास निघतात. राजापूरची मे महिन्यातील समता परिषद व पाच गावातून एक गाव – एक पाणवठा योजना यांची आठवण सातत्याने ते देत राहतात.

• • •

## सप्रेम नमस्कार

पृष्ठ ७ वरून

वंत वरीलप्रमाणे भूमिका जेव्हा घेतात तेव्हा ते 'स्वातंत्र्य' या कल्पनेपासून बरेच दूर गेलेले असतात–त्यांना भ्रमाचा झटका आलेला असतो. समाजाने व्यक्तीला दिलेले स्वातंत्र्य ही बाब केवल असूच शकत नाही. तिच्यात सामाजिक गरजेनुसार परिवर्तन, संकोच वा विस्तार होणे अपरिहार्य आहे.

एकाद्या नाटकाचा बरेवाईटपणा चार जणांनी ठरविणे हे जर वाईट तर तो एकाने ठरविणे त्याहूनही वाईट आहे.

स्वातंत्र्य (लिबर्टी) या संकल्पनेची ऐतिहासिक उत्क्रांती पाहिली तर असे दिसून येईल की, स्वातत्र्य कल्पनेत विकले जाण्याचे स्वातत्र्य हे अंतर्भूत आहे, नव्हे तेच प्रथम प्रस्थापित करावे लागले. पूर्वी देश, धर्म, राजा, अंगभूत श्रेष्ठत्व यांच्या नावाखाली कोणताही वाजवी मोबदला न देता बहुसंख्य वर्गास राबविले जाई. त्यांना आपले श्रम खुल्या बाजारात विकण्याचे स्वातंत्र्य नव्हते. औद्योगिक क्रांतीनंतर नवीन आर्थिक वर्गाने ते अनेक दशके झगडून प्रस्थापित केले. त्यानंतर मग स्वातंत्र्य कल्पनेचा विस्तार होत गेला. पूर्वी समाजाचें (खरे म्हणजे विशिष्ट हितसंबंधांचे) सर्वकल्प वर्चस्व व्यक्तीवर होते त्याची प्रतिक्रिया म्हणून आत्यंतिक व्यक्तिप्रधान अशी स्वातंत्र्याची कल्पना पुढे आली. आता ती परिस्थिती नाही.

व्यक्ती व समाज यांचे हक्क व अधिकार यांचे बऱ्याच प्रमाणात निश्चितीकरण झाले आहे (अगदी रशियातदेखील ! )

तेव्हा विचारस्वातंत्र्य हा जणू काही आपणच लावलेला शोध आहे असे मानून विचारवंतांनी डॉन क्विझोट-प्रमाणे आपला कल्पनावारू अमर्याद सोडण्याची काही गरज नाही. ६० (वा अधिक) टक्के लोकांची स्थिती सुधारण्यासाठीच विचारस्वातंत्र्याचा अवतार झाला आहे हेही त्यांनी विसरू नये व 'अन्न, वस्त्र, निवारा ही तर सुखाची पशुकल्पना' असा बुद्धीभेद करू नये

शेवटचा एक मुद्दा. 'मूठभर लोक सबंध समाजाच्यावतीने विचार-स्वातंत्र्याचा उपयोग करीत असतात, या विधानास जुन्या पुरोहितशाहीचा वास येतो. पूर्वी ज्याप्रमाणे राजा वा पुरोहित हेच सामान्यजनाच्या सर्वांगीण हिताचे कुलमुख्त्यार असत त्याप्रमाणे विचारस्वातंत्र्याचा उपयोग प्रातिनिधीक होतो, असे परांजपे यांना सुचवावयाचे आहे काय ? असे असेल तर त्यांना प्रेमाची सूचना की प्रातिनिधिकत्वाच्या पायावर सुख, दुःखे वा इतर कोणतेच मानवी व्यवहार – विचार करणे आता शक्य नाही. या पद्धतीने आपण पुन्हा प्लेटो प्रणीत '१ टक्क्यांच्या लोक-शाहीकडे' जाण्याचा धोका आहे. अर्थात राष्ट्रवाद्यांना तेच अभिप्रेत असेल तर प्रश्न नाही. पण 'राष्ट्रवाद' हा एक वैचारिक-भावनिक टप्पा म्हणून जागतिक विचारधारेने फार पूर्वीच 'ऐतिहासिक विचारसंग्रहालया'त दाखल केला आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रवादाचे गूढ, भावनिक व संदिग्ध स्वरूप कोणत्याही देशाचे अंतर्गत प्रश्न सोडवू शकले नाही. बहिर्गत प्रश्नां-मध्ये एकजूट घडवून आणणारी एक तत्कालिक प्रेरणा एवढेच स्थान राष्ट्र-वादास आता राजकीय विचारमीमांसेत उरले आहे.

जाता जाता एवढेच सांगावेसे वाटते की 'संपूर्ण समाजाच्या आत्म्यावर घाला घालण्याचे' पहिले श्रेय साम्य-वादाकडे जात नसून राष्ट्रवादाकडे जाते. इत्यलम् !

–चंद्रशेखर मराठे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुण येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर